आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ जुलै २०१२ | वर्ष २१ | अंक ८

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹१०

## www.sharadjoshi.in

## 'योद्धा शेतकरी' संकेतस्थळ

शुभारंभ दि. २२ जुलै २०१२



# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्याचे पाक्षिक

वर्ष २९ । अंक ८ । २१ जुलै २०१२

**मूल्य : ₹ १०**

संपादक

**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक

**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक

**डॉ. मानवेंद्र काचोळे**

**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक

**ज्ञानेश्वर शेलार**

अंक मांडणी

**श्रीकांत दत्तात्रय झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**

**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




## अंतरंग


आवाहन
**योद्धा शेतकरी संकेतस्थळाचा शुभारंभ**
गंगाधर मुटे ........ ३

मुद्दा
**संदर्भ हरवलेली लोकशाही**
गिरधर पाटील........ ४

आजकाल
**राजकीय पक्षांचा अजेंडा बदलतो आहे**
ज्ञानेश्वर शेलार........ ५

जागरण
**कापसाचा उफराटा बाजार आणि पर्याय**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ८

तंत्रज्ञान
**बांधावरच्या डिस्टिलऱ्या प्रत्यक्षात येणार का?**
संघटक ब्युरो........ १०

मिरचीचं खळं
**निंदकाचे घर**
बाबू सोंगाड्या........ १३

कॉमन नॉन सेन्स
**मिट्टी बोले, माटी बोले- '(अ) सत्यमेव जयते'**
सुधाकर जाधव ........ १४

**शेतकरी संघटना वृत्त** ........ १६

# कमतरता पाण्याची की बुद्धीची?

मान्सूनने जराशी ओढ देताच तथाकथीत समाजवादी व्यवस्थेचे नियोजन कोलमडून पडले. पाण्याची कमतरता लगेच जाणवायला लागली. हे सगळं शेतीच्या बाबतीत झालं असतं, तर त्याची कुणी चर्चा केली नसती. किंबहुना शेती आणि शेतकरी मेला तरी हरकत नाही; पण त्याकडे लक्ष द्यायचं नाही, असंच अधिकृत धोरण आहे. महानगरांचा पाणीसाठा कमी झाल्याचं आढळल्यावर महानगरांना पुरविण्यात येणारं पाणी एक दिवसाआड किंवा कमी आकाराने देण्याची वेळ आली की लगेच सगळ्यांनी ओरड सुरू केली. महाराष्ट्रात सर्वत्र धरणांमध्ये अतिशय कमी असा पाणीसाठा आहे (१०% टक्क्यांहूनही कमी). इतकंच नाही तर मृत साठ्यामधून पाण्याचा उपसा करावा लागतो आहे. हे सगळं मान्य करण्यासारखंच आहे, की धरणं म्हणजे दुसरं तिसरं काही नसून शहरांसाठीचे पाण्याचे हौद आहेत. समस्त पर्यावरणप्रेमी मंडळी जी आहेत त्यांचा आवाज आता बंदच झाला आहे. एरवी धरणाला विरोध करणारे जून-जुलै उलटला तरी धरणाच्या लाभक्षेत्रात पाऊस पडत नाहीये, धरणात पाणी नाहीये याबद्दल काहीच बोलायला तयार नाहीत. जवळपास सर्व पर्यावरणवाद्यांच्या तोंडात मोठमोठ्या गोष्टी पर्यावरणाच्या असल्या तरी प्रत्यक्षात त्यांच्या सगळ्या कृती या शहरधार्जिण्या आहेत. इतकंच नाही, सगळ्या पर्यावरणदात्यांचे आश्रयदाते शहरीच आहेत. त्यांची आलीशान कार्यालयेही शहरातच आहेत. आता त्यांनाच पाणी कमी मिळायला लागलं म्हटल्यावर त्यांना काही बोलताच येईना. अतिशय सामान्य माणसाला अगदी शेंबड्या पोरालाही कळणारी गोष्ट आहे, यापुढे पाण्याचं नियोजन काटेकोर करावं लागेल. सध्याची धरणं गाळमुक्त करावी लागतील. नवीन धरणांच्या योजना तातडीनं कार्यान्वीत करावी लागतील. आसामसारख्या राज्यात पुराने रस्ते वाहून जातात आणि इकडे पाणीकपातीची वेळ येते. याला उत्तर नद्या जोडणीसारखे वरकरणी अव्यवहार्य दिसणारे प्रकल्प असू शकतात किंवा कोकणाचं पाणी घाट माथ्यावरून उर्वरित महाराष्ट्रात वळवण्याच्या योजना असू शकतात. याच योजनांना पर्यावरणवाद्यांनी वारंवार विरोध केला होता. आता मात्र त्यांची बोलतीच बंद झाली आहे. पर्यावरणाच्या गोंडस नावाखाली पाण्याच्या प्रकल्पांना विरोध करायचा, त्याचा तोटा मात्र शेतकऱ्यांनी भोगायचा आणि शहरातल्या तमाम जनतेने भरपूर पाण्याचं सुख अनुभवायचं. आता नेमकी सुखालाच कात्री बसलेली बघून सगळ्यांची पाचावर धारण बसलेली आहे. एरवी मोठमोठ्या गप्पा करणारे राजकारणीही टँकरने मोफत पाणी वाटप अशा योजनांचं कौतुक करू लागले आहेत. इतकंच नाही, महानगरातल्या काही नगरसेवकांनी आपल्या भागात फुकट पाणीवाटप योजना राबवणेही सुरू केले आहे. हा सगळा बुद्धीचा दुष्काळ बघून किती कीव करावी कळत नाही. शेतीला पाणी द्यायचं म्हणून मोठमोठी धरणं उभारली, त्यासाठी जागतिक संस्थांकडून पैसे उचलले; पण प्रत्यक्षात हे सगळं पाणी शहरांना पिण्यासाठी म्हणून वापरलं, हे उघड गुपित आहे. पाणी शहरांना पिण्यापुरतं दिलं असतं तरीही टीका करण्याचं काही कारण नव्हतं; पण जेव्हा हे पाणी मोठ्या प्रमाणात उद्योगांना दिल्या गेलं आणि याचा कसलाही हिशेब ठेवायची तयारी शासनाची नाही, हे मोठं गंभीर आहे. वारंवार उद्योगक्षेत्राची भलामण करणारे अशा बाबींकडे लक्षपूर्वक दुर्लक्ष करतात. औरंगाबादसारखं शहर दारूच्या उद्योगामध्ये राजधानी बनू पाहातं. ते केवळ जायकवाडी धरणाचं पाणी फुकट आणि मुबलक उपलब्ध आहे म्हणून. या पाण्याच्या थेंबा थेंबाचा हिशेब द्यायचं म्हटलं तर विजय मल्ल्यासारख्या उल्लू उद्योगपतींच्या तोंडाला फेस येईल. नैसर्गिक साधनसंपत्ती सढळपणे वापरून तिची नासाडी करणारे नामानिराळे राहतात आणि बीटी कापूस पेरला म्हणून सर्वसामान्य उघड्यावाघड्या शेतकऱ्यांवरती गुन्हे नोंदविले जातात, हाच आमच्या शासनाचा 'पुरुषार्थ' आहे. जेव्हा जेव्हा शेतीच्या पाण्याचा प्रश्न येतो. तेव्हा तेव्हा पर्यावरणाचं खुळ निर्माण केलं जातं. योजनांना विरोध केला जातो. गावचा छोटा पाझर तलाव असो की, नर्मदा सरोवरसारखे महाकाय प्रकल्प असो, सगळ्यांची कामं रखडत ठेवण्यात पर्यावरणवाद्यांना आनंद होतो; पण हेच पाणी जेव्हा शहर आणि उद्योगांना वापरायचा विषय येतो तेव्हा मात्र सगळे मूग गिळून गप्प बसतात. सर्वसामान्य शेतकऱ्याला शेततळी बांधण्याचा शहाजोग सल्ला देणारं सरकार ज्यांच्याकडे अतिरिक्त जमीन आहे, अशा उद्योगांना असे सल्ले देतं का? रेन वॉटर हार्वेस्टिंगच्या नावाखाली नुसतं वरवरचं थोतांड सगळे करतात, विशेषतः शहरी भागामध्ये ते जास्त प्रमाणात केल्या जातं; पण प्रत्यक्षात याची गांभीर्यानं विचार तरी शासन असो, की शहरी नागरिक असोत, यांनी केलेला आहे काय? पावसानं ओढ दिली की सगळी चर्चा चालू होते, येत्या दोन महिन्यांत मोठा पाऊस कोसळला की ही सगळी चर्चा त्याच पाण्यामध्ये बुडून जाते. धरणाच्या पाण्याने किमान पातळी गाठलेली असते. सर्व शहरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय झालेली असते. धरणातल्या पाण्यावर हवा तसा डल्ला मारायची खुली मुभा उद्योगांना मिळालेली असते. मग हा विषय परत बंद होतो. ग्रामीण भागामध्ये जानेवारीपासूनच हंडाभर पाण्यासाठी वणवण करणाऱ्या बायका-पोरांची छायाचित्रे कधीमधी काही वर्तमानपत्रे छापतात. इतरत्र मात्र कोणाला त्याचे सोयरसुतक उरत नाही.

वारंवार होणाऱ्या याच गोष्टीकडे आपण गांभीर्याने बघणार आहोत का? स्वातंत्र्यानंतर नेहरूंच्या समाजवादी व्यवस्थेने सातत्याने उद्योगांच्या बाजूने, शहरांच्या बाजूने पक्षपाती भूमिका घेतली, तशी धोरणं राबवली. इतकं करूनही शहरांचे प्रश्न सुटले नाहीत आणि उद्योगही व्यवस्थाही सुधारली नाही, यालट सातत्याने ज्याची उपेक्षा केली, त्या शेतीमध्येच आणि ग्रामीण भागातच भविष्याच्या विकासाची काही आशा आहे आणि नेमकी त्याच लोकांची मूलभूत गरज असलेल्या पाण्याबाबत कोणी विचार करायला तयार नाही. मोठमोठ्या शहरांपासून दूरवरच्या अंतरावर घरांचे मोठे प्रकल्प उभे केले जात आहेत. त्यांच्यासाठी पाणी कसं द्यावं याचा प्रश्न आताच प्रशासनाला पडला आहे; पण हे करत असताना त्याच शहराजवळची जी खेडेगावे होती, वस्त्या होत्या, जिथे ग्रामीण व्यवस्था मोडकळीस आलेल्या अवस्थेत का असेना चालू होती, त्याचा कसलाही विचार आजही केला जात नाही. म्हणजे शहराजवळच्या वस्त्या आणि गावं उठवून लावायची, त्या ठिकाणी मोठ्या इमारती बांधायच्या, घरकुलांच्या मोठ्या योजना राबवायच्या आणि त्यांना पाणी द्यायची वेळ आली की, आता काय करायचं म्हणून डोक्याला हात मारून बसायचं, यापेक्षा शहरं असोत, की खेडीत असोत, पाण्याच्या शाश्वत उपलब्धतेसाठी काहीतरी ठोस करायचे की नाही? का नुसत्याच्या कागदोपत्री योजना राबवून बुद्धिचा दुष्काळ सिद्ध करायचा?



# www.sharadjoshi.in

## 'योद्धा शेतकरी' संकेतस्थळ- निवेदन व आवाहन

नमस्कार मंडळी,

रविवार दिनांक २२ जुलै २०१२ रोजी www.sharadjoshi.in 'योद्धा शेतकरी' या संकेतस्थळाचा उद्घाटन समारंभ होत आहे. शेतकरी संघटनेची स्थापना झाली आणि शेतकरी संघटनेचे अधिकृत कार्यालय उघडले गेले त्याला आज उणेपुरे ३० वर्ष होत आहेत. शरद जोशींच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळ म्हणजे जगातील सर्वांत मोठी शेतकरी चळवळ. ज्या शेतकरी चळवळीने शेतकरी समाजाला सन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवला, परिस्थितीशी दोन हात करून संघर्ष करण्याचा शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास जागवला,




जुने जाऊ द्या मरणालागुनी
जाळुनी किंवा पुरूनी टाका
सडत न एक्या ठायी ठाका
सावध! ऐका पुढल्या हाका
खांद्यास चला खांदा भिडवूनी

असा मंत्र देत नव्या तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला; त्याच शेतकरी संघटनेला आपले स्वतःचे संकेतस्थळ सुरू करून इलेक्ट्रॉनिक माध्यमात पदार्पण करायला मात्र ३० वर्षे वाट पाहावी लागली, हे जरासे विस्मयकारक असले तरी फारसे आश्चर्यजनक आहे असे मला वाटत नाही. शेतकरी संघटनेची वाटचालच मूळात जगावेगळी आहे. या संघटनेचा प्रथम नेता निर्माण झाला आणि त्यानंतर संघटनेची स्थापना झाली. त्यामुळे जसा नेता तसेच कार्यकर्ते शेतकरी संघटनेला लाभले. नेतृत्वच झुंजार, लढवय्ये आणि प्रत्यक्ष स्वतः चा जीव धोक्यात घालून रणांगण गाजवून इतिहास घडविणारे असल्याने या नेतृत्वाला अनुयायी कार्यकर्ते जे मिळाले तेही इतिहास लिहिण्यापेक्षा इतिहास घडविण्याचा अंगभूत पिंड असणारेच मिळाले. आपण केलेल्या शौर्याची गाथा आपल्याच मुखाने कथन करणे किंवा आपले स्वानुभव लिहून काढण्याविषयी हे सर्व कार्यकर्ते कायमच उदासीन राहिले आहेत. आमचे काम शेतकऱ्यांची काळ्या इंग्रजांच्या शोषणातून मुक्तता करण्यासाठी प्रसंगी स्वतःचे बलिदान द्यावे लागले तरी चालेल; पण रणांगणात लढून इतिहास घडविण्याचे आहे. इतिहास लिहिणारे इतिहास लिहीत बसतील, याच तऱ्हेची जवळजवळ सर्वच कार्यकर्त्यांची मनोभूमी तयार झाल्यानेच कदाचित शेतकरी संघटनेला साहित्य आणि प्रसारमाध्यमांत पाय रोवण्यात फारसे यश आले नसावे.

आणखी दुसरे कारण असेही असू शकते की १९८० पासून सततची आंदोलने, मेळावे, तुरुंगवास, त्या अनुषंगाने न्यायालयीन हेलपाटे यातही घरचे खाऊन लष्कराच्या भाकरी भाजणाऱ्या बिनीच्या कार्यकर्त्यांचा मोठा वेळ खर्ची पडलेला आहे. त्यातूनही थोडीफार उसंत मिळाली असेल तर आपापल्या पातळीवर सतत शेतकरी संघटनेचा विचार मांडत आणि प्रचलित समाजमनाला कलाटणी देत नव्या विचारांचे प्रकटीकरण आणि प्रसार करण्यातच सर्व कार्यकर्त्यांचा वेळ खर्ची पडला, याचीही नोंद घेणे गरजेचे आहे.

शेतकरी संघटनेत साहित्यिक, लेखक, कवी, शाहीर व पत्रकार तयार झालेच नाही, असेही नाही; पण शेतकरी संघटनेचा वैचारिक आवाका बघता ही संख्या मात्र नगण्यच म्हणावी लागेल. शेतकरी संघटनेला याविषयी जाणीव नव्हती किंवा जाणीवपूर्वक प्रयत्न झाले नाही, असेही नाही; पण या प्रयत्नांना फारसे यश आले नाही, हे निर्विवाद आहे. शेतकरी संघटनेची ही बाजू कमकुवत नसती तर शेतकरी संघटनेची वाढ आणखी वेगाने आणि विचारांचा प्रभाव अधिक व्यापकपणे जाणवायला मदत झाली असती. मात्र आता उशिराने का होईना; पण शेतकरी संघटनेने या दिशेने पाऊल टाकण्यास सुरुवात केलेली आहे, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे. शेतकरी संघटक नव्या आकर्षक स्टॉल सेलेबल स्वरूपात प्रकाशित व्हायला लागला आहे. शरद जोशींनी आजवर केलेल्या लेखनाला आणि प्रकाशित पुस्तकांना जनशक्ती वाचक चळवळीने पुनर्मुद्रीत करून वाचकांसमोर शरद जोशींच्या विचारांचे दालन खुले करून दिले आहे. मात्र शेतकरी संघटनेच्या विचारांना सातासमुद्रापार पोचवायचे असेल तर इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा वापर करून संकेतस्थळाची निर्मिती केल्याखेरीज पर्याय नाही, हे हेरून शेतकरी संघटनेचे अध्यक्ष श्री. रविभाऊ देवांग यांनी त्या दिशेने पाऊल टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्या प्रयत्नांचेच फलित म्हणजे या संकेतस्थळाची निर्मिती.

शेतकरी संघटनेचे संकेतस्थळ निर्माण करण्याची जबाबदारी रविभाऊंनी जेव्हा माझ्यावर सोपवण्याचा मनोदय व्यक्त केला, तेव्हा पहिल्या क्षणी मी तर गोंधळलोच. एवढ्या मोठ्या शेतकरी चळवळीला आणि शरद जोशींसारख्या महामानवाच्या कर्तबगारीला न्याय देऊ शकेल, अशा संकेतस्थळाच्या निर्मितीचे कार्य किती कठीण असू शकेल, याची जाणीव होणे, हेच माझ्या प्रथमदर्शनी गोंधळण्याचे प्रमुख कारण होते; पण इतिहास घडविण्याची सदैव ऊर्मी बाळगणाऱ्या शूरवीर पाईकांच्या या संघटनेत इतिहासाचा लेखाजोखा मांडण्यासाठी खर्डेघाशी करणारांची किती वानवा आहे, हे मला पक्के ठाऊक असल्याने या कामास स्वतःची पात्रता पारखून नकार देण्याचे किंवा टाळाटाळ करण्याचे कारण आपोआपच संपुष्टात आले होते.

आज हे संकेतस्थळ प्रत्यक्षात आकार घेण्याच्या दिशेने एक-एक पाऊल टाकत आहे. हे संकेतस्थळ परिपूर्ण करण्याचे कार्य वाटते इतके नक्कीच सहजसाध्य नाही. हे संकेतस्थळ म्हणजे शरद जोशी आणि शेतकरी संघटनेविषयी परिपूर्ण माहितीने ओतप्रोत भरलेला अनमोल खजिना व्हायला हवा. शरद जोशींच्या समग्र लेखनासहित अधिवेशने, मेळावे, रस्ता रोको अथवा रेल्वेरोको दरम्यान वेगवेगळ्या आंदोलनस्थळी घडलेल्या घडामोडींविषयीचे शक्यतो फोटोसहीत सर्व वृत्तांत येथे उपलब्ध व्हायला हवेत. आणि हे कार्य आपल्याला करायचेच. तुम्ही, मी आणि आपण सर्व मिळून.

तर चला मग; आपण साकार करूया एका महत्त्वाकांक्षी संकेतस्थळाचा एक महाप्रकल्प...!

**गंगाधर मुटे**
आर्वी (छोटी) - तह. हिंगणघाट, जि. वर्धा. मोब : ९७३०५७२००४
gangadharmute@gmail.com

■■

# संदर्भ हरवलेली लोकशाही



गिरधर पाटील

लोकशाहीची लोकांनी, लोकांसाठी, लोकांकरवी चालवली जाणारी व्यवस्था या पारंपारिक व्याख्येतील सारे संदर्भ नव्याने शोधू जाता हाती फारसे लागत नाही. आपण अनुभवत असलेल्या लोकशाहीचे नेमके असे काय झाले आहे की म्हणायला लोकशाही पण प्रत्यक्षात काहीतरी वेगळेच घडत असल्याचे दिसते आहे. लोकशाहीनेच दिलेल्या घटना व कायद्याच्या कक्षेत राहून, मात्र त्यातील कमतरतांचा गैरवापर करीत एक वेगळीच व्यवस्था उदयास येऊन सारा देशच एका अभूतपूर्व कोंडीत सापडलेला दिसतो आहे. याच लोकशाहीने दिलेल्या घटनेत समानतेचे एक महत्वाचे तत्त्व मानले गेले असले तरी लोकशाही फलप्रद ठरण्यात प्रचंड विषमता जाणवते आहे. काही ठराविक घटकांनी त्यांच्यासाठी चालवलेली व्यवस्था असे लोकशाहीचे स्वरूप होत असल्याने एक मोठा समाज घटक लोकशाहीच्या न्याय्य व समान वाटपाला पारखा ठरतो आहे. लोकशाहीच्या या मूळ व्याख्येतील हे सारे संदर्भच हरवल्याने आपण नेमके कुठे आहोत याचा विचार होणे आवश्यक आहे. यातला मुख्य धोका हा सर्वसामान्यांचा लोकशाहीकडून झालेल्या अशा भ्रमनिराशेपोटी या व्यवस्थेवरचा विश्वास उडण्याचा असून अगोदरच राजकारणाबद्दल फोफावत असलेली तुच्छतेची भावना वाढीस लागून लोक परत लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेपासून लांब जातात की काय अशी भीती निर्माण झाली आहे. राजकीय पक्षांचा सर्वसामान्यांना सक्रीय राजकारणापासून दूर ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न असतो. प्रत्यक्ष राजकारण व अपेक्षित राजकारण यातील तफावत अलीकडच्या निवडणुकांमधून अत्यंत बटबटीतपणे पुढे येत असून निवडणुकांमधील राजकीय भूमिका वा तत्त्वज्ञान बाजूला पडून सरळ सरळ आर्थिक व्यवहारांना केंद्रस्थानी ठेवून येनकेन प्रकारे सत्ता मिळवण्यासाठी लोकशाहीचा बळी दिला जात आहे. हेच दुस-या शब्दात सांगायचे तर निवडणुका हे लोकप्रतिनिधि निवडण्याची प्रक्रिया राहिलेली नसून सार्वजनिक निधिच्या वाटपाची लढाई असे तिचे स्वरूप झाले आहे. दुर्दैवाने अति तुरळक अपवाद वगळता सारे पक्ष आपले राजकीय तत्वज्ञान विसरून सत्तेच्या साठमारीत अनेक अनैतिक तडजोडी स्वीकारत हीच खरी लोकशाही असे मानण्याप्रत आलेले आहेत.

लोकशाहीचा अंमल टिकवून ठेवण्यासाठी ज्या अनुषांगिक व्यवस्था जसे संसद वा कार्यकारी मंडळ, काही प्रमाणात न्यायसंस्था या सा-यांच्या दृष्टीकोनात व त्यामुळे वर्तनात पडलेल्या बदलामुळे लोकशाहीचे सारे परिप्रेक्ष्यच धोक्यात आले आहे. हा एक नवा फिनॉमिना असून पाश्चात्यांच्या प्रगल्भ लोकशाह्यांचे संदर्भ जोडणे चूकीचे ठरेल. भारताच्या सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक पार्श्वभूमिवरच याचा विचार होणे आवश्यक आहे व त्यानुसार तसे उपायही शोधावे लागतील. जागतिक स्तरावर लोकशाहीकडून अगदी मानवी जीवनाची सार्थकता वा सुखसमाधानाशी जुळलेल्या अपेक्षा केल्या जात असल्या तरी भारतासारख्या विकसनशील देशात निदान नागरिकांच्या जीवनावश्यक गरजांची पूर्तता व त्याच्या सर्वांगिण आकांक्षाना संधि उपलब्ध करून देण्याची प्राथमिक जबाबदारी पार पाडावी अशी अपेक्षा गैर ठरू नये. मात्र या मूलभूत प्रश्नावरची ओरड ही नागरिकांचे अरण्यरूदनच ठरत असून परिस्थिती साध्या साध्या प्रश्नांनी गंभीर होत यावर तातडीचा व परिणामकारक तोडगा सध्यातरी कुणाच्या आवाक्यात असल्याचे दिसत नाही.

लोकशाही ही एक प्रक्रिया आहे आणि ती सतत चल असावी लागते. या चलतेचा वेग व उद्दिष्टपूर्तीची दिशा लोकशाहीच्या मूलभूत संकल्पनेला न्याय देणारी असावी. संसद, कार्यकारी मंडळ वा न्यायसंस्था या सा-या व्यवस्था आहेत. व्यवस्था या स्थितीवादी असतात आणि आपले बस्तान बसवण्याकडे त्यांचा कल असतो. कालांतराने त्यांचे निजी स्वार्थ तयार होत जातात. अर्थात काही प्रमाणात हे अपरिहार्य असले तरी जेव्हा मूळ उद्देशालाच खो घालण्याची स्थिती जेव्हा येते तेव्हा या स्वार्थाला आवर घालेल अशी यंत्रणा असावी लागते. आज समोर ठाकलेल्या अनेक समस्या सोडवतांना केवळ त्यांचे संदर्भबिंदू चूकल्याने निर्णय कोणासाठी जनतेसाठी की व्यवस्थेसाठी? या द्वंद्वात या प्रश्नांची क्लिष्टता व गंभीरता वाढीस लागते आहे. पक्षीय राजकारणाच्या स्वार्थाची किनार असलेल्या आघाडीच्या धर्माचा वा अपरिहार्यतेचा एक नवीनच बागुलबुवा ऊभा रहात असून सरकार या व्यवस्थेपोटी लोकशाहीचा बळी दिला जात आहे. दुर्दैवाने या व्यवस्थांचे निजी स्वार्थ लोकशाहीच्या मूलभूत उद्देशांनाच हरताळ फासत असल्याने नागरिकांच्या व्यापक सहभागाची नवीन व्यवस्था निर्माण होणे गरजेचे आहे.

लोकशाही स्वीकारली म्हणजे तिचे फायदे आपोआप मिळतील असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. विशेषतः भारतासारख्या कित्येक शतकांची सरंजामी अंमल असणा-या देशांमध्ये तर लोकशाहीकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने व तीव्रतेने होणे गरजेचे आहे. आज लोकशाहीकरणापेक्षा राजकियिकरणाची प्रक्रिया अधिक वेगाने होत असल्याचे दिसते आहे. अर्थात राजकियिकरण ही लोकशाहीकरणासाठी एक पूर्वअट असली तरी लोकशाहीकरणाला अवकाश मिळेल अशी लवचिकता न स्विकारल्याने सारी लोकशाही कुंठीतावस्थेत येऊन सर्वसामान्यांसाठी अनुत्पादक ठरते आहे. बालकाच्या शारिरिक वा मानसिक वाढीचा विचार न करता वयात आल्यानंतरसुध्दा तेच अंगडे-टोपडे घालण्याचा अट्टहास केल्यावर जे होईल तेच आपले होते आहे. देश हा जिवंत माणसांचा असतो, सतत उत्क्रांतशील असणा-या भावना असतात, आशा आकांशा असतात, त्यानुसार त्यांना वाव देणारी व्यवस्था विकसित होणे आवश्यक असते. नुकताच उभरू लागलेला अर्थवाद व झपाट्याने सारी जीवनपध्दतीच बदलवून टाकणा-या प्रगत तंत्रज्ञानामुळे आपल्या सा-या गरजा व उद्दिष्टे यांची नव्या परिप्रक्ष्यात उकल होणे गरजेचे आहे. दुर्दैवाने आपण आजही संकुचित अशा राजकिय सापळ्यात अटकत परिस्थिती अधिकोधिक गंभीर करीत अनेक नव्या धोक्यांना सामोरे जात आहोत.

सामूहिक निर्णय उचित व न्याय्य असणे हे लोकशाहीचे खरे मर्म आहे. या सामूहिक निर्णय प्रक्रियेची निकोपता व नागरिकांचा त्यातील प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग हे लोकशाहीचे प्रमुख अंग असले तरी पाच वर्षांतून एकदा मत देण्यापुरती सिमित झालेली प्रत्यक्षातली लोकशाही सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनापासून कोसो दूर गेलेली दिसते. आज सा-यांना काहीतरी बदल व्हावा हे प्रकर्षाने जाणवते आहे, हीच अस्वस्थता अनेक आंदोलने, उद्रेक व त्याच्याही पुढे जाऊन सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारी गुन्हेगारी वाढण्यातून जाणवते आहे. जागतिक परिस्थितीचा हवाला देत आपल्यावरील संकटांचे समर्थन करीत शहामृगासारखे किती दिवस आपण जमीनीत तोंड खुपसत स्वतःची आत्मवंचना करीत कालहरण करणार याचा विचार करण्याची वेळ आली आहे असे वाटते.

**डॉ.गिरधर पाटील** girdhar.patil@gmail.com. ■■

# राजकीय पक्षांचा अजेंडा बदलतो आहे

एका पक्षाचे धुरीण आणि राज्यात मोठ्या पदावर असलेल्या व्यक्ती त्या वेळी काय करीत होत्या. जळणारे मंत्रालय केवळ हात पाठीमागे बांधून किती मजले जळाले आणि कोणते बाकी राहिले? ते कसे जळाले नाहीत अशा टिप्पण्या जर करत असतील तर राजकीय पक्षांचा अजेंडा काय आहे, त्यांच्या कामाची पद्धत काय आहे हा प्रश्न जनतेला पडणे सहज शक्य आहे. राज्यात युतीच्या सरकारने सामायिक कार्यक्रमांवर काम करणे आवश्यक आहे. हा सामायिक कार्यक्रम कोणता हे आता पुन्हा दुसऱ्या निवडणुका जवळ येईपर्यंतही जनतेला अद्याप माहिती नाही. पक्षांनी, सरकारने, नेत्यांनी कोठेही याबद्दल जाहीरपणे वाच्यता केल्याचे आढळून आलेले नाही. त्यांची भांडणे केवळ वेळोवेळी येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीपासून तर विधानसभा आणि विधान परिषदेच्या जागांवर कोणी कोठे किती जागा लढवायच्या हेच सारखे ऐकू येते. या पक्षांचा हाच फक्त अजेंडा आहे का? राज्यशकट चालविण्यासाठी या पक्षांचे नेमके धोरण काय आहे?



**ज्ञानेश्वर शेलार**

माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाणांवर आदर्श घोटाळ्याचे आरोप झाले आणि त्यांना तडकाफडकी पदत्याग करावा लागला. हे एवढ्या घाईगर्दीत घडले की, त्यांच्या पाठीमागे कोणीही उभे राहिले नाही. कदाचित त्यावेळच्या राजकारणाचाही तो भाग असेल. किंवा ते खरोखर दोषी आहेत किंवा नाहीत याबद्दल कुणालाच खात्री नव्हती. आदर्शची केस वेगवेगळ्या वळणाने सध्या जात आहे. मात्र त्यांच्या पक्षाची भूमिका सध्या अत्यंत गंभीर वळण घेत आहे, हा राजकारणाच्या दृष्टीने विचार करणाऱ्यांनी लक्षात घेण्यासारखा मुद्दा आहे. कोणत्याही पक्षाच्या नेत्यावर आरोप झाल्यानंतर बहुतेक वेळा हे आरोप सिद्ध झाल्यास त्याला पक्ष साक्ष देणार नाही. किंवा पक्षाचा त्याच्याशी संबंध नाही अशी भूमिका भ्रष्टाचार, पदाचा गैरवापर जमिनी बळकावणे इत्यादी प्रकरणांमध्ये सगळेच पक्ष घेत होते. चव्हाणांबाबतही सुरुवातीला काँग्रेसने हीच भूमिका घेतली. आता मात्र चव्हाणांच्या पाठीराख्यांना ही भूमिका योग्य वाटत नाही. त्यांच्यावर अन्याय झाला आहे. पक्षाने त्यांच्या पाठीमागे उभे राहायला पाहिजे होते अशी उघड भूमिका घेण्यात आली याला कारण घडले ते विधिमंडळ अधिवेशनाच्या अगोदर तटकरेंनी अनेक कंपन्या काढून भ्रष्टाचार केल्याचे आरोप विरोधी पक्षांनी त्यांच्यावर केले. त्याची फारशी अजून चौकशी झालेली नाही. त्यातच पवारांनी त्यांची पाठराखण केल्याचे वक्तव्य केले. आणि त्यातूनच चव्हाण गटाला आपण आपल्या नेत्याला एकटे पडू दिले याचा सल उघड झाला. विधिमंडळ अधिवेशनाच्या अगोदर काँग्रेसच्या बैठकीत विधिमंडळामध्ये कोणते कायदे पास करायचे, विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना कसे उत्तर द्यायचे व राज्याच्या विकासाचे धोरण कसे आखायचे यावर चर्चा झाली की नाही, हे माहीत नाही कारण प्रसारमाध्यमांमध्ये याविषयी बाहेर तर फारसे काही आले नाही. हे खरे एखाद्या पक्षाच्या अजेंड्यावरील कार्यक्रम आहेत. त्या ऐवजी या बैठकीत चव्हाण एकाकी पडले आहेत आणि इतर पक्ष म्हणजे राष्ट्रवादी, भाजप, त्यांच्या नेत्यांवर किंवा कार्यकर्त्यांवर आरोप झाल्यास केसेस झाल्यास त्यांच्या पाठीमागे उभे राहतात. काँग्रेसच्या नेत्याने व पक्षाने मात्र चव्हाणांना एकाकी पाडले आहेत, पक्षाने त्यांच्यासाठी काहीही केलेले नाही. असा खडा सवाल चव्हाणांच्या पाठीराख्या आमदारांनी या बैठकीतच मुख्यमंत्र्यांना आणि पक्षाध्यक्षांना विचारला. हे एवढ्यावरच थांबले नाही तर अधिवेशन सुरू व्हायच्या तोंडावर जवळजवळ दोनशे कार्यकर्त्यांनी मिळेल त्या वाहनाने म्हणजे काही विमानाने आणि रेल्वेने दिल्लीकडे धाव घेतली आणि हा प्रश्न पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांच्याकडे मांडण्याचा प्रयत्न केला. अर्थात सोनिया गांधींनी त्यांना भेट दिली नाही हा प्रश्न वेगळा; परंतु एखाद्या पक्षाच्या नेत्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होतात आणि त्याची पाठराखण करण्यासाठी शे-दोनशे कार्यकर्ते राष्ट्रीय पक्षाध्यक्षांकडे जातात हे चित्र काही फारसे चांगले नाही. हा एखाद्या पक्षाचा कार्यक्रम आणि तोही विधिमंडळ अधिवेशनाच्या तोंडावर कसा काय होऊ शकतो. दोन-तीन दिवस अधिवेशनाला दांडी मारून नंतर हे नेते व कार्यकर्ते अधिवेशनात हजर झाले. आता हाच राज्यासमोरचा गहन प्रश्न आहे का?

या अगोदरही खासदार, आमदार, साखर कारखान्यांचे चेअरमन यांनी आपला अजेंडा बदलून टाकल्याची अनेक उदाहरणे आहेत. एकदा निवडून गेल्यानंतर हे नेते लोकांना पुन्हा पाच वर्षे तोंड दाखवत नाहीत. पुन्हा प्रचाराच्या निमित्ताने मला मत द्या, म्हणायलाच गावागावात येतात. विधिमंडळ आणि लोकसभा व राज्यसभेत कधी तोंड उघडत नाहीत, असे नेते गावोगावी सामुहीक लग्न लावणे विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात सहभागी होणे हाच आपला अजेंडा मानून कित्येक वर्षे काम करीत राहिले. त्यातही आता बदल होऊन चक्क भ्रष्टाचारात अडकलेल्या नेत्याची पाठराखण पक्षाने का केली नाही, असा जाब विचारण्यापर्यंत लोकप्रतिनिधी गेले आहेत.

पूर्वी एखाद्या राजकारणी व्यक्तीला ते राजकारण का करतात, असा प्रश्न विचारल्यास ते तात्काळ उत्तर द्यायचे की, निव्वळ आंदोलने करून, मोर्चे काढून लोकांचे प्रश्न सुटत नाहीत, त्यासाठी सत्ता हातात पाहिजे. सत्ता हाता असेल तरच आपण काही विकासाचे कार्यक्रम राबवू शकू. सामाजिक, सांस्कृतिक कार्य करू शकू. राजकारण हे खरे तर समाजकारणच आहे असे सांगायचे. आता मात्र जे लोकप्रतिनिधी म्हणून निवडून गेले आहेत, असे





प्रतिनिधी विधानमंडळात आणि लोकसभेत, राज्यसभेत मंत्रिमंडळाच्या बैठकीत फारसे बोलताना दिसत नाहीत; परंतु त्यांनी सामाजिक कार्यात मोठी आघाडी घेतल्याचे दिसते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुप्रिया सुळेंनी पक्षाच्या सुप्रिमो होण्यासाठी पद्धतशीरपणे सामाजिक कार्याचा विडा उचलला आहे. त्यांनी त्यासाठी केलेले प्रयत्नही पाहणे आवश्यक आहे. आपल्या कुठल्याही कार्याची फारशी पार्श्वभूमी नसताना केवळ वडिलांच्या पुण्याईने आणि पक्षाच्या कार्याच्या आधाराने त्या आपल्या बारामती या राखीव मतदार संघातून सरळ खासदार झाल्या. त्यानंतर त्यांनी आपल्या पक्षाचा युपीएमधील जो सामाईक अजेंडा आहे, त्याप्रमाणे काही कार्य करणे किंवा राज्यात काँग्रेसबरोबरच्या युतीत जो सामायिक कार्यक्रम आहे तो राबवण्याऐवजी सर्वप्रथम प्रयत्न केले ते बचत गटांच्या माध्यमांतून महिलांचे सबलीकरण करण्याचे. त्यासाठी प्राध्यापक युनूस यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. मुळातच बांग्लादेशात युनूस यांनी चालवलेली चळवळ ही त्यांना खरोखर महिलांचे सबलीकरणे आणि पत नसलेल्यांना पत देण्याचा कार्यक्रम होता. हा कार्यक्रम त्यांनी कुठल्याही राजकारणाशिवाय आणि राजकीय पक्षाच्या आधाराशिवाय केवळ अर्थकारणाच्या आधाराने राबवला. तोच कार्यक्रम आपल्याकडे काही पक्षांनी आणला आणि त्या कार्यक्रमाला नेहमीसारखेच राजकीय स्वरूप मिळाल्याने विविध अंगाने म्हणजे त्यासाठी साधेसोपे, सरळ कायदे करणे. कायद्यांच क्लिष्टता काढून टाकणे. बँकांना बचत गटांना कर्ज देण्यासाठी उद्युक्त करणे. निधी राखून ठेवणे. हे सर्व करूनही बचत गटांची चळवळ महाराष्ट्रात किंवा देशात फोफावली नाही, कारण ज्यांनी सुतगिरण्या, साखर कारखाने डबघाईला आणले तीच मंडळी तेथेही घुसली. चळवळ पुढे जाण्याऐवजी कुंठीत झाली. रोपट्याला जोम धरण्याअगोदरच राजकारण्यांनी खुडून टाकले. सुप्रिया सुळेंनी उमेदवारीच्या काळात याच बचत गटांनी तयार केलेल्या विविध घरगुती पदार्थांच्या शेवया, कुरडया, वडे यांच्या प्रदर्शनांची उद्घाटनेही विविध शहरांमध्ये केली. त्यांना बाजारपेठ मिळवून देण्याचे प्रयत्नही केले. आपल्याला राजकारणासाठी महिलांची वोट बँक तयार करण्यासाठी बचत गट वापरण्याचा त्यांचा प्रयत्नच बचत गटांना संपवण्याला कारणीभूत झाला. आज बचत गटांची चळवळ जी आल्या आल्या राजकारण्यांनी उचलली आणि राजकारण्यांसाठी उपयोग करण्याचा महिलांच मतांची बँक तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच बचत गटांना आज अवकळा आलेली आहे. ही चळवळ स्वयंसेवी संस्थांनीही उचलून धरली. मुळातच स्वयंसेवी संस्थांच्या कामावरच आज प्रश्नचिन्हे उभी राहिली आहेत. त्यांनी पाठिंबा दिलेली बचत गटांची चळवळ पुढे चालणे आणि तिने पश्चिम बंगालमधील चळवळीप्रमाणे रुजणे अशक्यप्राय करून ठेवले.

या चळवळीतून फारसे काही निष्पन्न होत नाही असे लक्षात आल्यावर सुप्रिया सुळेंनी आता भ्रूणहत्या, हुंडाबंदी, बालविवाह, महिलांची छेडछाड अशा महिलांशी संबंधित अनेक प्रश्नांना एकाच वेळी हात घातला आहे. त्यांना पाठिंबाही बऱ्यापैकी मिळत आहे. अर्थातच हे सगळे प्रयत्न राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता हातात घेण्यासाठी काही आमदार, खासदारांचा पाठिंबा घरातच वादविवाद झाला तर असावा आणि तो नसेल तर एखादी संस्था किंवा समाजातील मोठा गट आपल्या पाठीमागे असावा याची ही धडपड आहे, यातून निश्चितच या सामाजिक प्रश्नांना तोंड फुटणार आहे. ते तडीस जाण्याचे प्रमाण वाढेल; पण हा काही प्रत्यक्ष सत्तेत असलेल्या एखाद्या राजकीय पक्षाचा अजेंडा नाही. हा सामाजिक चळवळींचा अजेंडा आहे. तो उचलल्याने कदाचित त्याच्यातच राजकारण शिरून या समस्या सुटण्या ऐवजी आणखी जटील होतील की काय अशी भीती वाटू लागली आहे.

अजित पवार यांना महाराष्ट्रात अतिशय स्पष्टवक्ते, तडफदार आणि कामाची धडाडी असलेले म्हणून ओळखले जाते. त्यांच्या कामाच्या बोलण्याच्या फटकाऱ्यांनी अनेकजण पक्षातील किंवा विरोधी पक्षातील वेळोवेळी घायाळही झालेले आहेत. असे असताना मंत्रालय जळत असताना आणि त्याची आग बराच काळ विझवली गेलेली नाही, त्यावेळी मात्र हा सगळा तडफदारपणा महाराष्ट्राला दिसला नाही. एका पक्षाचे धुरीण आणि राज्यात मोठ्या पदावर असलेल्या व्यक्ती त्या वेळी काय करीत होत्या. जळणारे मंत्रालय केवळ हात पाठीमागे बांधून किती मजले जळाले आणि कोणते बाकी राहिले? ते कसे जळाले नाहीत अशा टिप्पण्या जर करत असतील तर राजकीय पक्षांचा अजेंडा काय आहे, त्यांच्या कामाची पद्धत काय आहे हा प्रश्न जनतेला पडणे सहज शक्य आहे. राज्यात युतीच्या सरकारने सामायिक कार्यक्रमांवर काम



करणे आवश्यक आहे. हा सामायिक कार्यक्रम कोणता हे आता पुन्हा दुसऱ्या निवडणुका जवळ येईपर्यंतही जनतेला अद्याप माहिती नाही. पक्षांनी, सरकारने, नेत्यांनी कोठेही याबद्दल जाहीरपणे वाच्यता केल्याचे आढळून आलेले नाही. त्यांची भांडणे केवळ वेळोवेळी येणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीपासून तर विधानसभा आणि विधान परिषदेच्या जागांवर कोणी कोठे किती जागा लढवायच्या हेच सारखे ऐकू येते. या पक्षांचा हाच फक्त अजेंडा आहे का? राज्यशकट चालविण्यासाठी या पक्षांचे नेमके धोरण काय आहे?

विरोधी पक्षांचाही अजेंडा लोकांना अद्याप कळालेला नाही. सध्या विरोधी पक्ष सतत भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आणण्याचे एकमेव धोरण राबवित आहेत. ही अत्यंत चांगली बाब आहे. त्याच बरोबर जर आपण सत्तेत असतो तर सरकार कसे चालले असते हे जनतेला वेळोवेळी सांगणे म्हणजेच त्या पक्षाचा अजेंडा; पण तो अद्यापपर्यंत कोठेही उघड झालेला दिसत नाही. कुणी सत्ताधारी पक्षाचा किंवा विरोधी पक्षाचा अजेंडा काय आहे? असे जर काही सापडले तर निश्चितपणे ते जनतेसमोर मांडावेत.

बऱ्याच कालावधीपासून देशामध्ये आणि राज्यामध्ये निवडणुकींच्या अगोदर एखाद्या प्रश्नावर परखड भूमिका घेतल्याचे चित्र राजकीय पक्षांनी उभे केल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. मात्र निवडून गेल्यानंतर या पक्षांची भूमिका अत्यंत वेगळी किंवा कधी कधी अगदी त्यांनी निवडणुकीअगोदर दिलेल्या अजेंड्याच्या आणि आश्वासनाच्या अगदी विरोधी अशीही दिसून येते. भाजपमध्ये अशा प्रकारचा गोंधळ सध्या उडालेला दिसतो. नरेंद्र मोदींनी गुजरातमध्ये निवडून येण्याअगोदर व मुख्यमंत्री झाल्यानंतर काय केले हे सर्व जगाने पाहिले आहे. त्याच मोदींची पाठराखण भाजपने लाजत, मुरडत का होईना आतापर्यंत केली. विकासपुरुष म्हणून मोदींना आणि विकसित राज्य म्हणून गुजरातला जनतेसमोर आणण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर संपूर्ण देशाचा गुजरात म्हणजे विकासाच्या अर्थाने, दंगलींच्या नव्हे जर करायचा असेल तर मोदींना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून सामोरे करण्यात आले. परंतु ही मोठी चूक असल्याचे आणि गुजरातचा विकासही मोदींमुळे झालेला नसून त्या अगोदर गुजराती जनतेने दाखवलेले व्यापारी आणि व्यवहार कौशल्य, नर्मदा सरोवर परियोजना पूर्ण होणे, पाण्याची आणि विजेची गुजरातमध्ये निर्माण झालेली मुबलकता हे होते. हे लक्षात आल्यानंतर आता मात्र मोदींना पक्षातूनच कडवा विरोध होत आहे. राजकीय यश मिळवण्यासाठी भाजपने एकेकाळी कुठलीही साधनशुचिता पाळली नाही आणि जरी त्यातून विकास झाला असेल तरीही अशा पद्धतीने विकास करायचा का? हा खरा प्रश्न आहे.

चांगले काम करणे व ते चांगल्या पद्धतीने करणे, चांगल्या मार्गाने करणे, यालाच साधनशुचिता म्हणतात; परंतु राजकीय यश मिळविण्यासाठी व आपले ईप्सित साध्य करण्यासाठी वाईट मार्गाने का होईना सत्तेत जाऊन बसायचे आणि नंतर सत्तेच्या जोरावर विकासाचे ढोल बडवायचे ही साधनशुचिता नाही. यातूनच राजकीय पक्षांचा अजेंडा आजकाल बदलतो आहे. सत्ता मिळवण्यासाठी समाजकारणाचा उपयोग करायचा किंवा अगदीच दोन समाजामध्ये, दोन घटकांमध्ये दुही माजवायची आणि सत्ता हस्तगत करायची किंवा आपल्या हातात सत्ता असेल तरीसुद्धा जनतेचे वीज, पाणी, रस्ते, शिक्षण, आरोग्य या मूलभूत समस्यांना हात न घालता कुठेतरी सामुदायिक विवाह पार पाडणे लग्नमुंजी घडवून आणणे, बचत गटांच्या कुरडया, पापडांची प्रदर्शने भरवणे किंवा त्याही पुढे जाऊन महिलांच्या छेडछाडीचे, भ्रूणहत्येचे प्रश्न आपल्या अजेंड्यावर घेणे हा काही राजकीय पक्षाचा अजेंडा होऊ शकत नाही. त्यासाठी कायदे मंडळात कायदे करण्यासाठी आपण सक्षम आहात ते न करता इकडे दररोज वर्तमानपत्रात फोटो आणि बातम्या कशा येतील? आणि आपल्याला प्रत्यक्ष जनतेतून कशा पद्धतीने प्रसिद्धी आणि पाठिंबा मिळेल? अशा प्रकारचे कार्यक्रम सर्वच पक्षांनी राबवायला सुरुवात केली आहे. चव्हाणांनी अगदीच त्यावर कडी करून आता भ्रष्टाचार झाला किंवा न झाला हे नंतर ठरवू; पण नेता जर आमचा असेल, आमच्या पक्षाचा असेल तर त्याची पाठराखण करणे हाच आमच्या पक्षाचा अजेंडा आहे अशी एक नवीच सुरुवात करून दिली आहे.

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# कापसाचा उफराटा बाजार आणि पर्याय

देशातल्या कापसाची निर्यात झाल्यामुळे कापसाचे भाव वाढतील म्हणूनच निर्यातबंदी लादण्यासाठी दक्षिणेतले गिरणी मालक आग्रही असतात सरकारातल्या बऱ्याच नेत्यांची गुंतवणूक कापड उद्योगात आहे आणि अशा नेत्यांच्या पाठिंब्यावर केंद्रातले सरकार उभे आहे म्हणून त्यांच्या आग्रहापुढे सरकारला झुकावेच लागते आणि कापूस उत्पादक शेतकऱ्याचा बळी द्यावा लागतो. हे थांबलेच पाहिजे. कापड उद्योगाला कच्च्या मालाचा पुरवठा करण्यासाठी सरकारने कापसाची खरेदी अंतरराष्ट्रीय बाजारातल्या दरानेच करावी आणि तो कापूस कापड उद्योजकांना पुरवावा; पण शेतकऱ्याच्या जिवावर कापड उद्योगास पोसणे हा अन्याय आहे. याचसोबत सरकारने जर कापड उद्योगास निर्यातक्षम बनविले तर तर त्यास अशा मदतीची गरजच लागणार नाही!



श्रीकृष्ण उमरीकर

(दिनांक ७ जून २०१२ च्या लोकसत्तामधील विजय जावंधियांचा कापसाचा उफराटा बाजार हा लेख वाचला. त्या लेखाला हे उत्तर.)

जावंधिया शेतकरी चळवळीतले जुने कार्यकर्ते आहेत. आधी शरद जोशींसोबत ते काम करायचे नंतर त्यांनी शेतकरी संघटना सोडून दिली आणि आपली वेगळी चूल मांडली. सदर लेखात त्यांनी कापसाच्या भावासंदर्भात उपयुक्त ऐतिहासिक दाखले दिले आहेत. कापसाच्या शेतकऱ्याच्या अनास्थेला सरकारची धोरणे कारणीभूत असल्याचे ते सांगतात; पण जेव्हा ते शेतकऱ्याची परिस्थिती सुधारावी म्हणून जो उपाय सुचवतात तो मूळ समस्येपेक्षाही भयंकर वाटतो म्हणून हे उत्तर देणे गरजेचे ठरते.

आज शेतकरी संघटनेचा पाईक असणारा शेतकरी खुल्या बाजाराची मागणी करतो आहे आणि अशा शेतकऱ्याच्या नावाने जावंधियांसारखे जाणते नेते अनुदानाची मागणी करत आहेत हे दुर्दैवी आहे. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर कोरडवाहू कापूस उत्पादकांना ऊस उत्पादकांना, साखरेच्या भावाला जसे राजकीय धोरणात्मक संरक्षण आहे तशाच धोरणात्मक पाठिंब्याची गरज आहे. उसाच्या शेतीला जसा सबसिडीचा आधार आहे तसाच कोरडवाहू कापूस उत्पादकांना देणे गरजेचे आहे.

उसाची कारखानदारी चालवून कारखान्याच्या संचालकांचाच विकास झाला आहे. काही शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा झाला; पण सरकारी आशीर्वादाने चाललेली उसाची शेती ही सर्व बाजुंनी विचार करता नुकसानीचीच ठरते. पश्चिम महाराष्ट्रातला पाण्याचा बेसुमार उपसा आणि त्यामुळे खालावलेली भूजल पातळी, जास्त पाण्यामुळे झालेली जमिनीची हानी आणि ऊस उत्पादकांचे लाड पुरवताना उर्वरित महाराष्ट्रावर झालेला अन्याय यांतली कोणतीही बाब अभिमानाने सांगावी अशी नाही. म्हणून उसाच्या शेतीसारखे संरक्षण-सबसिडी यांची मागणी करणे म्हणजे आपल्याच पायावर दगड पाडून घेणे आहे.

त्यांची दुसरी सूचना हमीभावाबद्दल आहे. जर कापसाला ४,५०० रुपयांचा हमीभाव दिला आणि आंतरराष्ट्रीय बाजारात मंदी आली तर सरकारला नुकसान सोसून कापूस खरेदी करावी लागेल. सरकारी खरेदीत भ्रष्टाचार होणे नित्याचे आहे. कापसाच्या खरेदीतून झालेल्या भ्रष्टाचाराबद्दल काही वेगळे सांगायला नको. जेव्हा बाजार भावापेक्षा चढ्या भावाने सरकार खरेदी करते तेव्हा कापसाचे जिनिंग-प्रेसिंग करणारे कारखानदार खरेदी न करता सरकारी कापसाच्या गाठी बनवतात आणि त्यातुन त्यांचे नुकसानच होते. जर हमी भावापेक्षा बाजाराचा भाव जास्त राहिला तर शेतकरी खासगी खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याला आपला कापूस विकतात. जसे चालू हंगामात झाले. सरकारचा हमी भाव ३,३०० रुपये होता. खुल्या बाजारात २-४ दिवस वगळता कापसाचे भाव एवढे कमी कधीच नव्हते. त्यामुळे कापसाची सर्व खरेदी खाजगी व्यापाऱ्यांनी केली. सरकारच्या धर-सोडीच्या धोरणाचा फटका व्यापाऱ्यांना बसल्यास ते आपला व्यापार राज्याबाहेर हलवू शकतात. ज्यामुळे पुन्हा राज्याचे नुकसानच होईल. हमी भाव-एकाधिकार यासारख्या खुल्या व्यापाराच्या आड येणाऱ्या धोरणांचा विचार न केलेलाच बरा.

कापसाच्या शेतकऱ्याला योग्य तो बाजारभाव मिळावा आणि त्यावर कर्जाच्या ओझ्याखाली दबून आत्महत्या करण्याची वेळ येऊ नये हे कोणीही मान्य करेल. हे साध्य करण्यासाठी पुढील उपायांचा विचार व्हावा. देशातला कापड उद्योग आंतरराष्ट्रीय कापड उद्योगाशी तुलना करता अत्यंत मागास अवस्थेत आहे. याला कारणीभूत सरकारची चुकीची धोरणे आहेत. जसे लघु उद्योगांना आरक्षण, हँक यार्न ऑब्लिगेशन इ.इ. देशांतल्या जुनाट-मागास कापड उद्योगाला जागतिक स्पर्धेमध्ये पुढे न्यायचे असेल तर सरकारने आपल्या धोरणात योग्य ते बदल करावेत. त्यासाठी चीनचा आदर्श घेण्यास हरकत नाही. चीनमध्ये कापसाची आयात करून त्याचे तयार कपडे करून निर्यात करण्यात येतात आणि त्यातून तो देश प्रचंड नफा कमावतो आहे. आपल्या देशाला तर कापूस आयात करण्याचीही गरज नाही. जोवर सरकारचे धोरण बदलत नाही तोवर त्या उद्योगास दिलेली मदत म्हणजे गळक्या भांड्यात ओतलेले पाणी. म्हणून देशातल्या कापड उद्योगाला कच्च्या मालाचा पुरवठा स्वस्तात व्हावा यासाठी सरकार कापसाचे भाव पाडण्याचे जे प्रयत्न करते ते थांबवावेत. कापूस उत्पादक शेतकरी, जिनिंग उद्योजक, सुतगिरण्या, कापडाच्या मिल, कापडावर प्रक्रिया करणारे उद्योग आणि सगळ्यात शेवटी कापडापासून कपडे शिवणारे कारखाने यांची एक साखळी आहे. जर सरकारला संपूर्ण उद्योगाचे हित साधायचे असेल तर कापसाचे भाव दाबून कापड उद्योग जिवंत ठेवणे वेडेपणाचे आहे कारण त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्याचे नुकसान होते आणि तो देशोधडीला लागतो.

सरकारने प्रथम कापसावरील निर्यातबंदी उठवावी. तशी ती सध्या उठवलेली आहे पण तीवर गाठींच्या संख्येचे बंधन आहे. ते काढून टाकणे गरजेचे आहे. तसेच निर्यात परवाना मिळवण्यासाठी, प्रत्यक्षात गाठी निर्यात करण्यासाठी जो वेळ लागतो तो कमी व्हावा. संपूर्ण प्रक्रियेत जो भ्रष्टाचार होतो तो थांबावा. निर्यातीच्या प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवण्यात यावी.

देशातल्या कापसाची निर्यात झाल्यामुळे कापसाचे भाव वाढतील



म्हणूनच निर्यातबंदी लादण्यासाठी दक्षिणेतले गिरणी मालक आग्रही असतात सरकारातल्या बऱ्याच नेत्यांची गुंतवणूक कापड उद्योगात आहे आणि अशा नेत्यांच्या पाठिंब्यावर केंद्रातले सरकार उभे आहे म्हणून त्यांच्या आग्रहापुढे सरकारला झुकावेच लागते आणि कापूस उत्पादक शेतकऱ्याचा बळी द्यावा लागतो. हे थांबलेच पाहिजे. कापड उद्योगाला कच्या मालाचा पुरवठा करण्यासाठी सरकारने कापसाची खरेदी अंतरराष्ट्रीय बाजारातल्या दरानेच करावी आणि तो कापूस कापड उद्योजकांना पुरवावा; पण शेतकऱ्याच्या जिवावर कापड उद्योगास पोसणे हा अन्याय आहे. याचसोबत सरकारने जर कापड उद्योगास निर्यातक्षम बनविले तर तर त्यास अशा मदतीची गरजच लागणार नाही!

कापसाच्या शेतीसाठी आवश्यक निविष्टांमधील सरकारी लुडबुडीमुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. जसे कापसाच्या बियाण्याच्या किमती सरकार ठरविते. सध्या बियाण्याच्या एका पिशवीची किंमत (७०० ग्रॅम) ९५० रुपये आहे. काही कंपन्यांच्या बियाण्याला जास्त मागणी असल्यामुळे ते २,३०० रुपयांच्या दराने काळ्या बाजारात विकल्या जात आहे. अर्थात ९५० रुपयांचे बियाणे २,३०० रुपयांनी विकताना जो पैसा जमा होतो त्यातून कोणाला किती वाटा मिळतो हे सुज्ञास सांगण्याची गरज नाही. सरकारने बियाण्यांच्या किमती ठरविण्याच्या भानगडित पडू नये. किमती ठरविण्याचे स्वातंत्र्य बियाणे तयार करणाऱ्या कंपनीला मिळावे. म्हणजे आपोआपच मागणी-पुरवठ्यानुसार बाजारभाव ठरतील. नाही तरी सध्या सरकारने ठरविलेल्या भावात बियाण्याची विक्री होतच नाही आणि लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे केवळ कापसाच्या बियाण्यांची किंमत सरकार ठरविते. इतर कोणत्याच बियाण्याची नाही!

जे बियाण्याचे तसेच काही खताचे. खताचे अनुदान देण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे खतांचा गैरवापर वाढला तसेच अनावश्यक खते वापरण्यात आली आणि त्यामुळे जमीनीचे नुकसान झाले. खताचे अनुदान पोषकद्रव्यांच्या गरजेवर अवलंबून असावे आणि त्याचा विचार करूनच ते द्यावे अशी तज्ज्ञांची शिफारस आहे; पण सरकारने अजून काही केलेले नाही. खतांच्या वाटपात खूप घोटाळे होत असतात. २००६-२००९ या काळात रु. ५६,००० कोटी एवढ्या किमतीचे खत ठरविलेल्या जागी पोहोचल्याची खातरजमा न करताच खत कंपनीला त्याचे पैसे देण्यात आले असा ठपका कॅगनेच सरकारवर ठेवला आहे. खतांच्या वितरणातल्या इतर अनेक त्रुटी सदर अहवालात कॅगने उजेडात आणल्या आहेत. सरकारने खताचे अनुदान द्यायचेच असल्यास, खत कारखान्यांना न देता शेतकऱ्याला द्यावे. जर कापसाच्या शेतीवरील सगळी बंधने सरकारने उठवली तर अनुदानाच्या कुबड्या कोणताही शेतकरी मागणारच नाही!

कापसाची शेती होणाऱ्या भागात सिंचनाचे प्रमाण वाढवण्यात यावे. सरकारने ठिबक सिंचनास प्रोत्साहन द्यावे. तंत्रज्ञान निवडीचे स्वातंत्र शेतकऱ्यास असावे. कारण बीटी बियाण्यांच्या विरोधात अधूनमधून ओरड होत असते. बीटीमुळे देशातले कापूस उत्पादन वाढले आहे हे नाकारता येत नाही. म्हणून बीटी लावणाऱ्या कष्टाळू शेतकऱ्यांची तुलना जुगाऱ्यांशी करणे अन्यायकारक आहे. बाजारात सर्वच बियाणे उपलब्ध असावे. काय हवे ते शेतकऱ्यास ठरवू द्या.

कापूस-कापड उद्योगात देशातली जवळपास १०% जनता गुंतलेली आहे. त्या उद्योगाचा सर्वांगिण विकास झाल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेस मजबूतीच येईल. अनुदानाची भीक न मागता शेतकरी कापसाचा मूक्त बाजार मागत आहे. शेतकऱ्याला मदत करण्याच्या नावाखाली जो भ्रष्टाचार चालू आहे तो संपवण्याची मागणी शेतकरी करत आहे. कारण प्रत्येक शेतकरी हा स्वाभिमानी उत्पादक-उद्योजक आहे. लाचार भिकारी नाही!!

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१. मो. ९४२२६४६२८३
umrikar@gmail.com

■■

# बांधावरच्या डिस्टिलऱ्या प्रत्यक्षात येणार का?

## संघटक ब्युरो

इथेनॉल निर्मिती हा व्यवसाय १९४९ सालच्या मुंबई दारुबंदी कायद्याने नियंत्रित केलेला आहे. शासकीय परवानगीशिवाय इथेनॉल निर्मिती करता येत नाही. तरीही इथेनॉल निर्मिती आणि तीही शेताच्या बांधावर कशी करता येईल याची केवळ प्राथमिक शास्त्रीय माहिती हे श्री. त्र्यं. ना. लिमये लिखित 'बांधावरची डिस्टिलरी अर्थात इथेनॉलची निर्मिती' या पुस्तक आहे. सदर पुस्तकातील इथेनॉल व इथेनॉल निर्मितीविषयक प्राथमिक तसेच सोप्या पद्धतीने मांडलेली माहिती निश्चितच उपयोगी आहे. शेतकरी संघटनेची भूमिका तंत्रज्ञान स्वातंत्र्याची आहे, म्हणूनच या पुस्तकाचा संपादित अंश पाक्षिक शेतकरी संघटकच्या वाचकांसाठी देत आहोत.

### बांधावरची डिस्टिलरी अर्थात इथेनॉलची निर्मिती
### लेखक - त्र्यं. ना. लिमये

जगावर असलेले ऊर्जासंकट नवीन नाही. औद्योगिक विकासासाठी, रसायन व औषध निर्मितीसाठी इथेनॉलचा वापर पाहता त्याचे महत्त्व लक्षात येते. इथेनॉल निर्मिती हा व्यवसाय १९४९ सालच्या मुंबई दारुबंदी कायद्याने नियंत्रित केलेला आहे. शासकीय परवानगीशिवाय इथेनॉल निर्मिती करता येत नाही. तरीही इथेनॉल निर्मिती आणि तीही शेताच्या बांधावर कशी करता येईल याची केवळ प्राथमिक शास्त्रीय माहिती देणारे हे पुस्तक आहे. पुस्तकाच्या आरंभी आणि शेवटी स्पष्टपणे इथेनॉल निर्मितीवर असलेल्या बंधनाची इशारावजा माहिती दिली आहे. इथेनॉलकडे पेट्रोलला पर्यायी इंधन म्हणून तसेच तुलनेने स्वस्त म्हणून पाहिल्या जाते. त्याची निर्मिती करण्यासाठी शेती उत्पादनांचा वापर करण्यावर अनेकजण आक्षेप घेतात; परंतु अतिरिक्त उत्पादन झाल्यामुळे पडणारे शेतीमालाचे भाव तसेच अचानक बदलणाऱ्या हवामानामुळे खराब झालेले धान्य व फळे या अडचणींना तोंड देण्यासाठी अशा शेती उत्पादनाचे इथेनॉलमध्ये रुपांतर करणे हा योग्य पर्याय आहे. इथेनॉल निर्मिती हा शेतीपूरक उद्योग ठरू शकेल. अशा परिस्थितीत शेतकऱ्याला इथेनॉलची व इथेनॉल निर्मितीच्या प्रक्रियेची प्राथमिक माहिती असणे उपयोगी पडेल.

### बांधावरच्या डिस्टीलऱ्या प्रत्यक्षात येणार का?

या प्रश्नाचे उत्तर देण्यापूर्वी :

१) इथेनॉलच्या उत्पादनाबद्दलचे धोरण व कायदे,

२) खनिज तेलाची परिस्थिती,

३) अतिरिक्त शेती उत्पादनांची समस्या,

४) ऊस, साखर व इथेनॉल निर्मितीची परिस्थिती,

५) अमेरिकेत बांधावरच्या व फिरत्या डिस्टिलरींच्या झालेल्या प्रयोगाची माहिती इत्यादी पाच मुद्द्यांचा थोडक्यात आढावा घेऊ.

### १) महाराष्ट्रातील शासकीय धोरण व कायदे :

इथेनॉलचे उत्पादन हा गृहखात्याच्या अखत्यारितील विषय आहे. आयुक्त दारुबंदी व उत्पादन शुल्क यांची इथेनॉल उत्पादनावर देखरेख असते. १९४९ सालचा दारुबंदी (बॉम्बे प्रोहीबीशन ॲक्ट १९४९) हा या देखरेखीचा आधार आहे. नवीन डिस्टीलरी सुरू करण्यासाठी आयुक्तांकडे अर्ज करावा लागतो. ही परवानगी मिळणे सहज शक्य नाही. बांधावरची डिस्टिलरी ही तर पूर्ण नवीन कल्पना आहे. त्यामुळे मूळ कायद्यातही बदल करावा लागेल. कायद्यात बदल करणे ही वेळ जाणारी गोष्ट असली तरी अशक्य नाही. कारण गेल्या ५०-६० वर्षांत इथेनॉलबद्दलचे शासकीय धोरण व कायदे यांत अनेक बदल झाले.

१९४९ च्या मूळ कायद्यात पूर्ण दारुबंदी होती. शासनाला निधीची चणचण भासू लागल्यावर दारुबंदी नियम बदलले. आज दारुबंदीची परिस्थिती काय आहे हे आपण पाहतोच आहोत. शासनाने अलीकडेच (२०१० साली) मद्याच्या परवाना शुल्कात वाढ करण्याचे ठरविले. या वाढीने सरकारच्या तिजोरीत २०० कोटी रुपयांची भर पडणार आहे. शासनाला खूप मोठ्या प्रमाणात निधी मिळवून देणारे इथेनॉल व मद्य हे पदार्थ आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या नवीन मद्य धोरणानुसार इ.स. २००१ मध्ये शासनाने वाईन संबंधीचे धोरण जाहीर केले. या धोरणानुसार अनेक वाईनऱ्या महाराष्ट्रात सुरू झाल्या. द्राक्ष उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या रास्त मागण्यांमुळेच हे शक्य झाले. अन्य फळ उत्पादकांनीही अशी मागणी लावून धरली आहे. त्यामुळे अन्य फळांपासून वाईन तयार करण्याची परवानगीही शासनाला द्यावी लागेल. वाईन उत्पादनावरील सर्व प्रकारचे कर १० वर्षासाठी माफ करून शासनाने वाईन उत्पादनाला प्रोत्साहन दिले.

धान्यापासून विलायती मद्य तयार करण्याच्या डिस्टिलरींना सरकार अनुदान देऊन प्रोत्साहन देत असल्याचे चित्र २०१० साली तयार झाले होते. महाराष्ट्रातील सत्ताधारी व विरोधी पक्षातील अनेक मोठ्या नेत्यांची नावे ह्या डिस्टिलरींच्या प्रवर्तकांमध्ये होती. पश्चिम महाराष्ट्रातील डिस्टिलऱ्यांप्रमाणे मोहाच्या फुलांपासुन मद्य निर्मितीच्या डिस्टिलऱ्या उभारण्यास परवानगी देण्याचा मानस असल्याचे वनमंत्री श्री. बबनराव पाचपुते यांनी पत्रकार परिषदेत सांगितले होते.

### २) खनिजतेलाची परिस्थिती -

दुसऱ्या बाजूस खनिजतेलाची परिस्थितीही, दिवसेंदिवस अवघड होताना दिसते आहे. २७-२-२०१० रोजी पेट्रोल चा भाव रु. ५१.४२ होता. तो वाढत जाऊन १६-१-२०११ ला ६३.१९ झाला. भाव वाढ करूनही सरकारी कंपन्यांचा संभाव्य तोटा ७३,६०० कोटी रूपये आहे असे शासन म्हणते.

दुर्दैवाने भारताच्या खनिजतेलाच्या एकूण गरजे पैकी ७० टक्के तेल आयात करावे लागते. खनिजतेल उत्पादन करणाऱ्या मध्यपुर्वेतील देशातील बदलती राजकीय परिस्थितीती पहाता तेथे केव्हाही युध्दजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याचे तज्ञ म्हणतात. दुर्दैवाने खरेच तशी परिस्थिती निर्माण झाली व खनिजतेलाच्या पुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम झाला तर शासनाला पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस ह्यांचे रेशनिंग करण्याची पाळी आली तर आश्चर्य वाटू नये.

खनिजतेल उत्पादन करणाऱ्या देशातील बदलती राजकीय परिस्थिती, खनिजतेलाच्या उत्पादनावर येणाऱ्या नैसर्गिक मर्यादा, खनिजतेलाची मागणी व पुरवठा ह्यातील तफावत इत्यादि घटक लक्षात घेतले तर नजिकच्या भविष्याकाळात शासनाला इथेनॉलच्या उत्पादनाचे व त्याच्या इंधन म्हणून वापराचे धोरण बदलावेच लागेल.




**पृष्ठे : ८०, किंमत : १०० रु.**

**पुस्तकासाठी संपर्क :** प्रा. त्र्यं. ना. लिमये
२२४, राजेंद्र सोसायटी, सहकार नगर, क्र. २,
पुणे-४११००९ दूरध्वनी : ०२०-२४२२२७१५

### ३) अतिरिक्त शेती उत्पादनांची समस्या-

मागणी पेक्षा जास्त उत्पादन झाले की त्याला अतिरिक्त उत्पादन म्हणतात. औद्यिगिक अतिरिक्त उत्पादन साठवून ठेवता येते कांदा, टॉमेटो , द्राक्षे वगैरे सारख्या शेतमालाचे अतिरिक्त उत्पादन झाले की असा माल अक्षरशः उकिरड्यात टाकला जातो. अशा पिकांचा उत्पादन खर्चही वसूल होत नाही. इ.स. १९९६ पासून अतिरिक्त उसाचाही प्रश्न निर्माण झाला.

११जून २०११च्या दैनिक सकाळ मध्ये अतिरिक्त असा बद्दल छोटा लेख आला होता. ह्या लेखानुसार इं.स. १९९६ ते २००८ ह्या काळात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण झाला.

त्यामुळे सव्वालाख हेक्टर वरील उसाचे गाळप साखर कारखाने करू नशकल्याने वाया गेला. ह्या वाया गेलेल्या उसापोटी महाराष्ट्र शासनाला अडीचशे कोटी रुपये भरपाई म्हणून द्यावे लागले. नंतरच्या काळातही अतिरिक्त उसाची समस्या होतीच. ''२०१०-११ च्या अतिरिक्त उसाची समस्या सोडविण्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही आणि सरकारवरही बोजा पडणार नाही असा प्रस्ताव सरकारला सादर करण्यात येईल.'' असे श्री. शिवाजीराव पाटील, अध्यक्ष साखर संघ, यांनी सांगितले. अतिरिक्त उसाच्या समस्येवर इथेनॉल निर्मिती हा उपाय असू शकतो.



### ४) उस, साखर, व इथेनॉल निर्मितीची परिस्थिती -

पेट्रोल मध्ये इथेनॉल मिसळण्यास सुरूवात सप्टेंबर २००९ साली झाली असला तरी केंद्र शासनाने २००३ सालीच पेट्रोल मध्ये इथेनॉल मिसळण्याचा निर्णय केला होता. सुरूवातीला ९ राज्ये व केंद्रशासित प्रदेशात पेट्रोल मध्ये इथेनॉल मिसळण्यास सुरूवात करण्याचे ठरले. शासनाकडून इथेनॉल मिश्रणाच्या धोरणाचा वरचेवर आढावा घेतला जातो व त्यानुसार इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण ठरविले जाते. सन २०१७ अखेर इथेनॉल मिश्रणाचे प्रमाण २० टक्के पर्यंत नेण्याचे उदिष्ट नव्या धोरणात ठेवले आहे.

भारतात मुख्यतः साखर कारखान्यात तयार होणाऱ्या मळी पासून इथेनॉल बनतो. त्यामुळे उसाच्या उत्पादनात जसे चढ उतार होतात तसे चढ-उतार इथेनॉलच्या उत्पादनात होतात.

उसाचे उत्पादन मुख्यतः १) ऊस खरेदी दरावरून शेतकरी व साखर कारखाने ह्यांच्यात होणारे वाद, २) साखरेचा भाव व ३) साखरेच्या आयात-निर्याताचे निर्णय ह्या मुख्य बाबींवर अवलंबून असते. त्यामुळे ऊस उत्पादनात सातत्य आढळत नाही. ह्याचाच परिणाम म्हणून इथेनॉल उत्पादनातही सातत्य आढळत नाही.

सन २००३ ते. २००५ ह्या काळात इथेनॉल उत्पादन कमी झाल्याने ४० कोटी लिटर इथेनॉल ब्राझील ह्या देशातून आयात केले. २००९ साली २८ कोटी लिटर आयात केले. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचे उदिष्ट यशस्वी व्हावयाचे असेल तर इथेनॉल निर्मितीत वाढ करून उत्पादनात सातत्यही राखावे लागेल. इथेनॉल निर्मितीत वाढ व सातत्य साधावयाचे असेल तर गोडी ज्वारी, काजू सारखी वाया जाणारी फळे, कंद पिके, व धान्ये तसेच गवत ह्या कच्या मालाचा इथेनॉल निर्मितीसाठी विचार करावा लागेल.

### ५) अमेरिकेतील बांधावरची डिस्टिलरी

मॉन्टाना राज्यात चेरीचे उत्पादन घेतले जाते. अन्य शेती उत्पादना प्रमाणेच एखाद्या हंगामात चेरीचे उत्पादन प्रचंड येत असे, तर कधी कधी निसर्गाच्या अवकृपेने चेरीचे उत्पादन विक्री योग्य होत नसे. १९८१ मध्ये मॉन्टाना राज्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती विभाग व मॉन्टाना राज्यातील शेती खात्याने पोलसन गावाच्या लिओनार्ड हर्न फार्मवर वाया जाणाऱ्या ह्या शेती उत्पादना पासून इथेनॉल इंधन बनविणारी छोटी डिस्टलरी बसविली. लिओनार्ड हर्न फार्मवरील छोटा ट्रॅक्टर

# मुकी बिचारी...

*(शनिवार, ३० जून २०१२ च्या इंडियन एक्स्प्रेसमध्ये सुरजित भल्ला यांच्या प्रसिद्ध झालेल्या लेखाचा स्वैरानुवाद संघटकच्या वाचकांसाठी.)*

नवे अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी देशाची अर्थव्यवस्था लवकर मूळ पदावर आणावी. त्याची सुरुवात त्यांनी कृषीमालाच्या भावाबद्दल आपले धोरण सुधारून करावी. शेतीमालाची आधारभूत किंमत वाढवल्यास त्याचा फायदा पंजाबातल्या कुळांना आणि इतरत्र असलेल्या श्रीमंत शेतकऱ्यांनाच होतो. तसेच फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या दलालांनाच होतो; पण शेतमालाची आधारभूत किंमत वाढवून भूमीहीन शेतमजुराचा काय फायदा होतो किंवा अल्पभूधारक शेतकऱ्याचा कसा फायदा होतो याचे स्पष्टीकरण काँग्रेसपक्षाने दिलेले नाही.

(या मुद्द्याबद्दल आम्ही भल्ला यांच्याशी सहमत होऊ शकत नाही. मुळात शेतकऱ्यांची अल्पभूधारक-मजूर अशी विभागणी करणे आम्हाला मंजूर नाही. शेतीमालाच्या उत्पादन-विक्रीमध्ये सरकारी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव देणे हे सरकारचेच कर्तव्य आहे. जो भाव दिलेला आहे तोही उत्पादन खर्चावर आधारित नसुन अशास्त्रिय पद्धतिने दिलेला आहे असाही आमचा आक्षेप आहे. जर शेतमालाची बाजारपेठ सरकारी हस्तक्षेपापासून पुर्णपणे मुक्त झाली तरच मालाच्या भावाबद्दल शेतकऱ्याची काही तक्रार असणार नाही.)

पुढे त्यांनी काँग्रेस सरकारच्या राजवटीची तुलना रालोआशी केलेली आहे. ते म्हणतात, 'काँग्रेसने आपल्या राजकीय-आर्थिक कामगिरीचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट होईल की त्यांची कामगिरी इतर कोणत्याही पक्षापेक्षा वाईट आहे. देशाची मंदावलेली आर्थिक प्रगती आणि २००९ नंतर झालेल्या प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसचा झालेला पराभव यावरून हे उघड आहे.)

पण त्याच वेळी देशातली ३/४ जनता जरी अर्धपोटी राहत असली तरीही देशाच्या धान्य उत्पादनात मात्र वाढ झाल्याचे श्रेय काँग्रेसला घेता येईल!

१८७१ पासूनच्या हवामानाची अकडेवारी पाहता असे दिसून येते की १९९८-२००३ या दरम्यान झालेला पाऊस १५ सर्वांत कमी पावसांपैकी होता. पण काँग्रेसच्या काळात मात्र त्या मानाने बरा पाऊस झालेला आहे. असे असले तरीही कृषीक्षेत्राचा विकास मंद गतीनेच होत आहे. म्हणजे साधारण ३% पेक्षा कमी. जर हा वेग वाढवायचा असेल तर आपले कृषीविषयक धोरण बदलावेच लागेल. कदाचित नरेंद्र मोदींना कृषी मंत्री करावे, कारण त्यांच्या गुजरातमध्ये कृषीक्षेत्राचा विकास दर १०% जवळ झाला आहे! कोणतेही निकष लावले तरीही हे स्पष्ट आहे, की कृषी क्षेत्राचा विकास रालोआ राजवटीत काँग्रेसच्या राजवटीपेक्षा चांगला होता.

शेतीचा विकासदर वाढला नाही तरीही शेतीला दिल्या जाणाऱ्या अनुदानात मात्र भर पडली आहे. शेतमालाच्या हमी भावात १०% वाढ झाली तर महागाई निर्देशक ३% नी वाढतो. आरबीआय मात्र महागाई का वाढली हे न पाहता व्याजाचे दर वाढवते ज्यामुळे अर्थव्यवस्था मंदावते. पंतप्रधान आणि आरबीआय यांनी एकत्र येऊन अर्थव्यवस्थेला योग्य मार्गावर आणावे.

**संघटक ब्युरो**

■■

---

**बांधावरच्या डिस्टिलऱ्या... पान ११ वरून पुढे**

ह्या इथेनॉल इंधनावर चालविला जात असे. १९८१ मधील प्रयोगाचा अनुभव लक्षात घेऊन इ. स. १९८४ मध्ये ह्याच राज्यात फिरत्या डिस्टिलरीचा प्रयोग केला गेला. मॉन्टाना राज्याच्या नैसर्गिक साधन संपत्ती सुरक्षा खात्याने हा प्रकल्प राबविला.

मॉन्टाना राज्यातील लेक काउंटी मध्ये २८०० एकरात बटाट्याचे पीक घेतले जाते. सरासरी उत्पादन एकरी १३.५ टन येते. ह्या उत्पादनातील सरासरीने १० टक्के बटाटे विक्री योग्य नसतात असा अनुभव होता. ह्या सर्व बटाट्यांचे इथेनॉल इंधनामध्ये रूपांतर करून दर वर्षी ४५३६० गॅलन म्हणजे सुमार १७२००० (एक लाख बहात्तर हजार) लिटर इथेनॉल मिळेल असा अंदाज होता. एक टन खराब बटाट्यां पासून अंदाजे ४८ लिटर इथेनॉल मिळेल असे गृहीत धरले गेले. राज्यातील अन्य भागातील शेतकऱ्यांना बांधावरच्या डिस्टिलरीचा फायदा मिळावा म्हणून फिरती डिस्टिलरी बांधण्यात आली. मॉन्टाना राज्यातील ज्या भागातील शेती उत्पादन वाया जाते व जेथे रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत अशा भागात इथेनॉल उत्पादनाचे प्रकल्प चालवावेत असे उदिष्ट ह्या प्रकल्पाने आपल्या समोर ठेवले होते. ह्या सर्व प्रयोगाचा, ७० पानांचा सविस्तर वृत्तांत इंटरनेटवर उपलब्ध आहे.

### होय बांधावरच्या डिस्टिलऱ्या प्रत्यक्षात येणे शक्य आहे!

ज्या प्रमाणे द्राक्ष उत्पादकांनी शासनाकडे पाठपुरावा करून वाईन निर्मितीचे धोरण बदलण्यास भाग पाडले त्याप्रमाणे इथेनॉल निर्मितीसाठी लागणारा कच्चा माल उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना, एकजुटीने शासनाकडे पाठपुरावा करून, द्राक्ष उत्पादकांचा कित्ता गिरवून, इथेनॉल निर्मितीचे धोरण बदलण्यास शासनाला भाग पाडावे लागेल. शासनाचे धोरण बदलले तर बांधावरच्या डिस्टिलऱ्या महाराष्ट्रात सुरू होणे अशक्य नाही.

### बांधावरच्या डिस्टिलऱ्या प्रत्यक्षात येण्यासाठी काही उपाय

कोकण कृषी विद्यापीठाने काजू, जांभूळ व करवंद ह्या फळांपासून वाईन बनविण्याच्या पद्धती सिद्ध करण्यासाठी २००५ साली प्रयोग केले. वाईन व्यवसायाचे भवितव्य फार उज्ज्वल नाही. २०१० साली सुमारे ६० हजार लिटर वाईन न खपल्याने पडून होती. २०११ च्या हंगामातील वाईन साठविण्याची अडचणही वाईनरींच्या समोर असल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात होत्या. न खपणारी वाईन करण्यापेक्षा इथेनॉल इंधन बनविण्याचे, बांधावरच्या डिस्टिलरीचे तंत्रज्ञान विद्यापीठाने विकसित केले गेले तर जास्त उपयोगी होईल ह्यात शंका नाही.

महाराष्ट्रातील अन्य उत्पादनांपेक्षा काजू, फणस, आंबा इत्यादी फळे खूप मोठ्या प्रमाणात वाया जातात असा अनुभव आहे. मॉन्टाना राज्याच्या अनुभवावरून कोकणातही बांधवरच्या डिस्टिलरीचे तंत्रज्ञान कृषीखात्याला व कोकण कृषी विद्यापीठाला विकसित करणे अवघड नाही.

हैद्राबादला असलेल्या 'इक्रिसॅट' ह्या अंतरराष्ट्रीय शेती संशोधन संस्थेत कमी पावसाच्या प्रदेशात होणाऱ्या पिकांचे संशोधन चलते. इक्रिसॅटने गोडज्वारीच्या अनेक जाती शोधल्या आहेत. महाराष्ट्रातील कृषीविद्यापीठातही गोडज्वारीचे संशोधन चालते. गोडज्वारीला जिराईत ऊस म्हणता येईल. दुष्काळी भागात गोडज्वारीच्या लागवडीला प्रोत्साहन दिल्यास शेतकऱ्याला धान्या बरोबर जनावरासाठी खाद्य तर मिळेलच, शिवाय रोजगारही उपलब्ध होईल.

**प्रा. त्र्यं. ना. लिमये**

पुणे-४११००९

■■

# निंदकाचे घर...

जगद्‌गुरू तुकोबारायांनी म्हंटलयना 'निंदकाचे घर असावे शेजारी,' इथे आमच्या नशिबात शेजारी कशाला, आख्ख राज्यच आमचं निंदक आहे. तेही ठीक आहे; पण आमच्या दुर्दैवाने हे निंदक आमच्या मित्र पक्षातंच आहेत असं नाही तर खुद्द आमच्याच पक्षात आहेत. बरं आमचे निंदक हे साफसुथरे आहेत असं नाही तर तेसुद्धा 'आपलं टाकतात झाकून अन् लोकांचे पाहतात वाकून' अशा प्रवृत्तीचे आहेत आणि हे सारे निंदक आमच्याच नशीबात आले आहेत. आमचंच दुर्दैव, दुसरं काय?

आता हे ताजं, गरमागरम प्रकरणंच बघा ना. आमच्याच मित्रपक्षाचे टग्यादादा, त्यांनी सुद्धा आमच्यावर अविश्वास दाखवावा याला काय म्हणावं? मंत्रालयाला लागलेल्या आगीत आमच्या नेत्याचं चेंबर सुरक्षित राहिलं यावरून त्यांनी शंका व्यक्त केली! त्यांना खरी परिस्थिती माहिती नव्हती, असं नाही; पण संशयाची सुई त्यांच्या कडून आमच्याकडे वळवायचा हा एक प्रयत्न दुसरं काय? तरी बरं, आम्ही पलट वार नाही केला. नसता आम्ही म्हणू शकलो असतो, अहो टगेराव, आमची बात सोडा हो, तुमच्या त्या तटकऱ्याच्या जमीन हडप प्रकरणाच्या फाईलीचं काय? आहेत का त्या सुरक्षित? त्या इंडिया बुक्सच्या फाईलीचं काय? नाशिकच्या नॉलेज सिटीच्या फाईलीचं काय? एवढंच कशाला, तुमच्या स्वतःच्या बाबतीतल्या फाईलींच काय? तेव्हा राव कशाला बाता करता, त्यापेक्षा 'एकमेका साह्य करू अवघेची धरू 'अर्थपंथ' या उक्तीशी आपण ईमान राखावं आणि त्यासाठी 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' या उक्तीचा अवलंब करावं यातंच उभयताचं हित आहे. या क्षणी मित्रपक्षाला आठवण द्यावी वाटते ती सध्या गाजत असलेल्या हजारो कोटींचा खर्च करूनही सुमारे एक टक्काच भिजवण वाढलंय या प्रकरणी काढावयाच्या श्वेत पत्रिकेची.

अर्थात हे काम तितकं सोपं नाही आम्हालाही माहीत आहे आणि तुम्हालाही. या 'पाणी प्रकरणाचे धागेदोरे कुठपर्यंत पोहोंचले आहेत आणि त्याचा आवाका किती मोठा आहे हे लक्षात घेतलं तरी आमचा सुद्धा थरकाप होतो. त्यामुळे आम्ही सुद्धा केवळ गुरकावल्याचं नाटक करतो आणि तुम्ही सुद्धा भ्याल्याची ॲक्टींग करता आणि हे सारं नाटक चाललं आहे याची मात्र ती जी 'पब्लीक' नावाची संस्था आहे तिला खात्री वाटते. रस्त्यात पडलेल्या भिकाऱ्याच्या मृतदेहाकडे पहावं आणि पुढे जावं अशा पादचारी वृत्तीच्या माणासासारखं तेही पेपरात वाचतात अन् पुढच्या पानावरच्या 'धकधक' गर्लच्या बातम्याकडे वळतात. त्या मुन्नी, शीला, जलेबी बायांच्या दिलखेचक फोटोकडे पाहून निदान नेत्र सुख तरी मिळतं.



या अगीत आमच्या 'आदर्श' भोवती संशयाचं जाळं विणलंय तर तुमच्याही 'लवाशा'ला घेरात आणलंय. तेव्हा फिट्टमफाट झालं असं समजून आपण लोकांना नशा आणणाऱ्या जनहिताच्या आपल्या योजना पेटाऱ्यातून काढून. आपण लोकांचं लक्ष या आगीकडून आपण केलेल्या 'विकासा'कडे वळवूया.

तुम्हाला आम्हाला दोघांनाही माहीत आहे, की आपली आघाडी ही राज्याच्या विकासासाठी, उत्थापनासाठी 'कटिबद्ध का बद्धपरिकर' काय म्हणतात त्यासाठी बांधील आहे. आपण केलेल्या बांध बंधाऱ्यामुळे राज्य कसं हिरवं हिरवं झालं आहे, हे लोकांना वारंवार ठणकावून सांगितलं पाहिजे. लोकांची स्मरणशक्ती फार कच्ची असते हो. लहान बाळाप्रमाणे. त्याच्या पुढे नवीन खेळणं टाकलं, की ते बाळ जूनं खेळणं टाकून देतं. तसं लोकांपुढे नवीन घोषणा दिली, की ते जूनं विसरतात. आमच्या हात नाही का आम आदमी साथ एके काळी होता. म्हणजे तशी घोषणा होती. त्यावेळी लोकांनी साथही दिली. आता आपण आपला हात काढून घेतलाय तरी लोकांनी आपली साथ सोडली का? नाही! का नाही? तर लोकांना आपलसं करायचं नवीन भलभक्कम 'आर्थिक' नियोजन आपण शोधून काढलंय. लोक काय क्षणिक लाभाला पाहतात. आपण मात्र दीर्घ काळाकडे पाहतो. आमची गुंतवणूक ही भांडवल उभारणी समजून उद्याच्या लाभाकडे नजर लावतो आणि गल्लीपासून दिल्लीपर्यंत बैठक जमवतो आणि आता तर पब्लीकला या निवडणूक 'अर्थाची' नशा चढली आहे. तेव्हा पक्षातल्या आणि मित्र पक्षातल्या निंदकांनो, तोंड आवरा, बाहेरच्या निंदकांनी कितीही ओरडा केला तरी काळजी करू नका. ते कितीही आरेडले तरी त्यांची मत आपल्या 'खिशात' आहेत, हे विसरू नका. त्यांना सांगावं 'बोंबल बोंबल तुझी खुशी, मत आम्हाला तू रहा उपाशी!'

आपण लोकांना सांगायला पाहिजे, की आपलं राज्य आज अनेक क्षेत्रात भारतात अव्वल स्थानावर आहे. इतर राज्यांना आपण खूपच मागे टाकलंय. उदा. गुन्हे विभाग. आपलं राज्य हे अव्वल नंबरवर आहे. याचा आपल्या आबाला रास्त अभिमान आहे. घडलेल्या गुन्ह्याच्या प्रकरणात आपण कोर्टात केसेस दाखल करतो; पण त्यात शिक्षा होण्याचं प्रमाण आख्ख्या भारतात आपलं राज्य आघाडीवर आहे, म्हणजे खालून! बिहार सारख्या राज्यात केवळ ६९ टक्के कनव्हिक्शन होतं तर आपल्या राज्यात केवळ ९ टक्केच. प्रकरणात शिक्षा होते त्याचा आपल्याला अभिमान वाटायला पाहिजे. एखादा गुन्हा घडला, की त्या प्रकरणातून गुन्हेगाराला 'सुधारण्याची' संधी मिळावी या 'उदार' मानवतावादी दृष्टीकोनातून आपली यंत्रणा कामी लागते. आधी आपले 'अर्थवान'

पान १६ पाहा

# मिट्टी बोले, माटी बोले- '(अ) सत्यमेव जयते'



सुधाकर जाधव

चित्रपट अभिनेते आमिर खान यांची दूरदर्शन आणि इतर वाहिन्यांवरून प्रसारित होणारी 'सत्यमेव जयते' ही मालिका बरीच लोकप्रिय झाली असून चर्चेचा विषयदेखील बनली आहे. महत्त्वाच्या सामाजिक समस्यांची दखल घेऊन त्यासंबंधी जनजागरण करण्याचा स्तुत्य प्रयत्न या मालिकेतून करण्यात आला आहे. मालिकेतून नवे प्रश्न किंवा नवे उत्तर मांडण्याचा प्रयत्न झाला अशातला भाग नाही. ज्या प्रश्नांवर सरकारी व सामाजिक संघटनांच्या पातळीवर भरपूर प्रयत्न झालेत तेच प्रश्न समोर ठेवण्यात आले आहेत; पण कसलेला कलाकार असलेल्या आमीर खानची प्रश्न मांडण्याची हातोटी पूर्वीच्या प्रयत्नावर मात करून गेली आहे. सरकारी व सामाजिक संघटनांनी वर्षानुवर्षे प्रयत्न करून अशा प्रश्नावर जागरण करण्यात जितके यश मिळविले त्यापेक्षा अधिक यश आमीर खानच्या दीड तासाच्या कार्यक्रमाने मिळविले. आमीर खानचे कलाकार म्हणून असलेले आकर्षण आणि त्याने घेतलेली मेहनत कार्यक्रमाच्या यशाला जितकी कारणीभूत आहे तितकीच 'सॉस-बहू'च्या अतिरेकी मालिकांच्या माऱ्याने कंटाळलेल्या प्रेक्षकांना सामाजिक समस्यांची मांडणी करणारी मालिका त्यातील नाविन्यामुळे आवडली तर नवल वाटायला नको. समाजात सामाजिक प्रश्नांबाबत फारसे दुमत नसते व त्या सोडविण्याच्या आवश्यकतेवर तोंडदेखले एकमत देखील असते. म्हणूनच कार्यक्रमात स्वतःच्या सुनांना छळणाऱ्या सासवा दुसऱ्यांच्या सुनांचा छळ पाहून हेलावून जातात आणि त्यांचा पदर आपसूक डोळ्याला लागतो. आपल्या दांभिकतेचे सद्गुणात रुपांतर करण्याची संधी अशा कार्यक्रमातून मिळण्याची सोय हेदेखील ही मालिका लोकप्रिय होण्यामागचे कारण आहे. डॉक्टर मंडळींवर बेतलेल्या भागाने निर्माण झालेला वाद आणि खळबळ ही मालिका अधिक लोकप्रिय बनवून गेली. असंवेदनशील बनत चाललेल्या डॉक्टर मंडळींवरच्या लोकांच्या रागाला आमिरखानने वाट मोकळी करून दिल्याने तर हीरो असलेला आमीर खान सुपर हीरो बनला आणि त्याची मालिकाही सुपरहिट बनली. वाद निर्माण करून चित्रपट सुपरहिट करण्याचा नुस्खा मालिकेलाही लागू होतो हे लक्षात आल्यावर आमीर खानसारखा मुरलेला कलाकार मालिकेच्या पुढच्या भागात नव्या वादांची पेरणी करणार हे ठरल्यासारखेच होते. नंतरच्या एका भागात शेतीसंबंधीचे जे चित्रीकरण व सादरीकरण झाले त्यातून लगेच याची पुष्टी झाली. मालिकेच्या या भागात सेंद्रीय शेती विरुद्ध रासायनिक शेती या वादाला खमंग फोडणी देऊन हा वाद रंगविण्यात आला. रासायनिक शेतीच्या परिणामांचे भीषण व भीतीदायक चित्र प्रेक्षकांसमोर मांडून सेंद्रीय शेतीच्या बाजूने कौल दिला गेला. रासायनिक शेतीबद्दलचे रंगविलेले अति- अतिरंजित चित्रण सोडले तर या बाबत तक्रार करावे असे काही नाही. रसायनाचे मानवी शरीरावर परिणाम होतच असतात. आपण आजारी पडलो की जी आधुनिक औषधी घेतो त्याचे जसे मानवी शरीरावर परिणाम होतात, तसेच परिणाम शेतीत वापरल्या जाणाऱ्या रसायनाचेही संभवतात. आजारी पडले तरी औषध घेऊ नका अशी सांगणारी आणि औषधाविना उपचार करून बरे करण्याचा दावा करणारी हकीम मंडळी जशी वैद्यकीय क्षेत्रात असतात तशीच शेतीक्षेत्रातही रासायनिक शेतीऐवजी सेंद्रीय शेतीकडे वळा अशी सांगणारी मंडळी आहे. यात आक्षेपार्ह असे काहीच नाही. याच पद्धतीने आमीर खानला सेंद्रीय शेतीचा पुरस्कार करायचा असेल तर त्यावरही आक्षेप घेण्याचे कारण नाही; पण आज जी शेती समस्या आहे त्याच्या मुळाशी शेती करण्याची पद्धत आहे किंवा शेतकरी आत्महत्येसाठी शेती करण्याची पद्धत कारणीभूत आहे असा दावा आमीर खानने केला तो मात्र अत्यंत आक्षेपार्ह आहे. शेती समस्या काय आहे आणि शेतकरी आत्महत्या का करतात याबद्दलचे संपूर्ण अज्ञानच यातून प्रकट होते. शेती समस्येबाबतची आमीर खानने केलेली मांडणी नुसतीच सवंग आणि वरवरचीच नाही तर चुकीची देखील आहे. शेतकऱ्याला अडाणी आणि अज्ञानी समजून त्याने शेती कशी केली पाहिजे, काय करावे आणि काय करू नये असा त्याला उपदेश करणाऱ्या मंडळीची आपल्याकडे कमी नाही. अगदी क्षुल्लक कारणासाठी समारंभपूर्वक मेजवान्या देणारी मंडळी शेतकऱ्यांनी लग्न समारंभावर खर्च करता कामा नये असा हितोपदेश करीत असतात. तेच त्यांच्या कर्जबाजारीपणाचे कारण असल्याचे ते ठाम प्रतिपादन करीत असतात; पण ही मंडळी समारंभपूर्वक ज्या मेजवान्या देतात त्यातून त्यांची भरभराट होते आणि आवश्यक अशा समारंभावरचा अल्प खर्चदेखील शेतकऱ्याला का कर्जबाजारी बनवितो हा प्रश्न या मंडळीना कधीच पडत नाही. शेती परवडत नाही म्हणून जोड धंदे करा असा सल्ला देणाऱ्याचीदेखील कमी नाही; पण हा सल्ला मानून गाई-म्हशी किंवा कोंबडी-बकरी पालन करायचे शेतकऱ्यांनी ठरविले तर त्याच्यावर कर्जाचा बोजा तेवढा वाढतो हे या सल्लागारांना कधीच दिसत नाही. दिसत नाही म्हणण्यापेक्षा त्यांनी डोळ्यावर सोयीस्कर झापडे लावलेले असते. कारण शेतकऱ्यांनी असे जोड धंदे केले की यांना स्वस्तात दूध-दुभत्यावर आणि मांसावर ताव मारता येतो! आता रासायनिक शेती सोडून सेंद्रीय शेती केली की शेतकरी कर्जमुक्त आणि सुखी होईल असा संदेश शेतकऱ्यांना दिला जात आहे. शेतकरी जेव्हा शेतीत रासायनिक खताचा वापर करीत नव्हता किंवा पिकांवर कीटकनाशकाची फवारणी करीत नव्हता तेव्हा सुखी होता का याचा कोणी विचार करीत नाही. तेव्हा शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्ज नसल्याचा खोटा गवगवा केला जात आहे. शेतकऱ्याला तेव्हा कर्ज घेण्याची गरज नव्हती तर गावोगावी सावकार कसे निर्माण झाले आणि कशाच्या बळावर त्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी हडपल्या या प्रश्नांचे उत्तर या मंडळीनी दिले पाहिजे. हरितक्रांती पूर्वीच्या सेंद्रीय शेतीने शेतकऱ्याच्या दारिद्र्यात वाढच होत होती. तो केवळ कर्जबाजारीच नव्हता तर त्याच्या कुटुंबाची उपासमारही होत होती. हरितक्रांतीनंतर तो पूर्वीच्या तुलनेत अधिक कर्जबाजारी झाला असला तरी त्याची व त्याच्या कुटुंबीयांची उपासमार आता होत नाही हे सत्य नाकारता येत नाही. दरवर्षी शेतीतल्या तोट्यात भर पडत असल्याने त्याचा कर्जबाजारीपणा वाढत जाणे अपरिहार्य आहे. त्याचा रासायनिक खत किंवा कीटकनाशकाच्या फवारणीशी फारसा संबंध नाही. रासायनिक खत किंवा कीटकनाशकाच्या फवारणीतून निर्माण झालेल्या अन्न-धान्याने सुखासीन लोकांचे आरोग्य धोक्यात येत असेलही; पण रासायनिक खते किंवा कीटकनाशक औषधीमुळे शेतकऱ्याचे आर्थिक आरोग्य बिघडले असे म्हणणे शेती प्रश्नाबद्दलचे अज्ञानच दर्शविते. सेंद्रीय शेती करीत असताना शेतकरी सुखी नव्हता आणि आज तो शेतीत रसायने वापरू लागला तरी सुखी नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून सेंद्रीय शेती की रासायनिक शेती हा वाद निरर्थक आहे. कोणत्याही पद्धतीने शेती केली तरी

शेतकऱ्याचे मरण अटळ आहे. कारण शेतकऱ्याच्या मरणाची बीजे सरकारच्या धोरणात आणि सुखी समाजघटकाच्या मनोवृत्तीत दडले आहे. ही गोष्ट समजणे अर्थातच आमीर खान आणि त्याच्या टीमच्या कुवती बाहेरचे आहे. त्याने चुकीच्या पद्धतीने शेतीप्रश्न मांडण्याऐवजी त्या प्रश्नाला हातच घातला नसता तर ते जास्त शेतकरी हिताचे ठरले असते असेच आता म्हणावे लागेल; पण सत्यमेव जयतेच्या या भागात नुसतेच अज्ञान नव्हते तर अतिरंजित आणि अशास्त्रीय थाटाचा प्रचार असल्याने शेतकरी समुदायाबद्दलच्या सुखी सदरा घालणाऱ्या समाजाच्या गैरसमजात अधिक भर पडणार आहे.

## अतिरंजित आणि प्रचारकी

कीटकनाशकाचे दुष्परिणाम हे औषधी सेवनाच्या दुष्परिणामांसारखेच असतात; पण 'सत्यमेव जयते'मध्ये रंगविण्यात आलेले चित्रण टोकाचे अतिरंजित असून शेतकरी आपल्या स्वार्थासाठी इतरांना विष खाऊ घालतात असा गैरसमज यामुळे पसरणार आहे. अन्नामधील विषाची ही कथा म्हणूनच विषारी आणि विखारी बनली आहे. यात केरळमधील एका जिल्ह्याचे, राजस्थानमधील एका जिल्ह्याचे आणि पंजाबप्रांताचे उदाहरण देण्यात आले. एन्डोसल्फानमुळे केरळच्या त्या जिल्ह्यात किती वाईट परिणाम झाले आहेत हे दाखविण्यात आले. या कथेतील पक्की कडी एवढीच आहे की रोगग्रस्त मुले आणि व्यक्ती खऱ्या आहेत. या एका कडीत अनेक कमजोर कड्या गुंफून कथा तयार झाली आहे. यातील पहिली कमजोर कडी ही आहे की ज्या रोगाचे वर्णन करण्यात आले आहे तो रोग एन्डोसल्फानचा वापर या भागात सुरू होण्याआधीपासून अस्तित्त्वात असल्याचे वैद्यकीय दाखले उपलब्ध आहेत. तो रोग ज्या कारणाने झाला असेल त्यात एन्डोसल्फानची भर पडून किंवा एन्डोसल्फानचा संयोग होऊन अधिक फोफावला असणे शक्य आहे. जसे एखादे औषध एखाद्या व्यक्तीवर विपरित प्रतिक्रिया करते तसेच एन्डोसल्फानची त्या भागात विपरित परिणाम झाले असतील हे नाकारता येत नाही. जेथे एन्डोसल्फान विपुल प्रमाणात वापरले जाते त्या भागातील परिणामांचा अभ्यास न करता केरळच्या या भूभागाचा अभ्यास करण्यामागे हे विशेष कारण असू शकते; पण ज्याची प्रतिक्रिया होते असे औषध एखाद्या व्यक्तीला देणे टाळतात, तशीच त्या भागातील फवारणी टाळायला हवी होती. तेच औषध दुसऱ्या रोग्याला दिलेले चालते तसेच या कीटकनाशकाची फवारणी दुसऱ्या भागात केली जाऊ शकते. एन्डोसल्फानचा सर्वात कमी वापर केरळ राज्यात होत होता; पण या कीटकनाशकाच्या वापरात आघाडीवर असणाऱ्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश यांसारख्या राज्यात असे दुष्परिणाम दिसून आलेले नाहीत हे इथे लक्षात घेतले पाहिजे. परवडणारे आणि बहुविध पिकांसाठी उपयुक्त असल्याने एन्डोसल्फान शेतकऱ्यांत अधिक प्रिय होते; पण या कीटकनाशकांविरुद्ध आघाडी उघडण्यामागचीसुद्धा एक कथा सांगितली जाते आणि ती कथा अधिक तर्कसंगत असल्याने इथे सांगितली पाहिजे. इ.स. २००० च्या आसपास एन्डोसल्फानचे पेटंट संपुष्टात आल्याने इतर ठिकाणी याचे उत्पादन सुरू झाल्याने मूळ उत्पादक असलेल्या युरोपियन कंपनीच्या उत्पादनाची मागणी घटून त्या कंपनीला एन्डोसल्फानचे उत्पादन परवडेना. त्यामुळे कंपनीने ते उत्पादन बंद करून पर्यायी उत्पादन घेण्याचा निर्णय घेतला; पण नवे उत्पादन विकायचे असेल तर एन्डोसल्फानचे उत्पादन जगभरातून बंद होणे गरजेचे होते. म्हणून युरोपीय राष्ट्रांत आणि भारतासारख्या देशात एन्डोसल्फानच्या दुष्परिणामांचे अहवाल तयार झालेत. सुनीता राव यांच्या नेतृत्वाखालील दिल्लीच्या पर्यावरणावर काम करणाऱ्या ज्या संस्थेने केरळमधील परिणामांचा अभ्यास केला त्या संस्थेला या अभ्यासासाठी कोट्यावधी डॉलर्स युरोपियन राष्ट्रांनी पुरविल्याचे भारत सरकारच्या गृह मंत्रालयाने मान्य केले आहे. स्वयंसेवी संस्था खोटा अहवाल कशाला तयार करतील या आमीर खानने विचारलेल्या भाबड्या प्रश्नाचे उत्तर यात दडलेले असू शकते. एन्डोसल्फान वापरलेला कोणताही शेतकरी दाखविण्यात आलेल्या दुष्परिणामांवर विश्वास ठेवणार नाही; पण ज्यांचा शेतीशी आणि या कीटकनाशकांच्या फवारणीशी संबंध आला नसेल त्यांचा मात्र चटकन विश्वास बसेल. तसा विश्वास बसल्यानेच एन्डोसल्फानवर बंदी आली आहे. पंजाबमधून रोज रेल्वेने भरभरून कॅन्सरचे रोगी राजस्थानातील एका रुग्णालयात जातात हाही असाच अतिरंजकतेचा रंजक नमुना आहे. बारा डब्यांची कॅन्सर ट्रेन गृहित धरली आणि बसण्यासाठी जेवढ्या जागा आहेत तेवढेच रुग्ण त्यातून जातात असे गृहित धरले तर रोज हजार रुग्ण पंजाबातून राजस्थानात उपचारासाठी जातात असा त्याचा अर्थ होतो. हे सत्य असेल तर सारा पंजाबच कॅन्सरग्रस्त असला पाहिजे; पण तशी वस्तुस्थिती नाही. उलट भारतातील सर्वांत राकट आणि धडधाकट माणसे पंजाबातच आढळतात. पर्यावरणाचा बाऊ करून पैसे लाटणाऱ्या संस्थांच्या जाळ्यात आमीर खानच्या सत्यमेव जयतेचा हा भाग अडकल्याने शेती आणि शेतकरी यांच्या संदर्भातील चुकीचे चित्र आणि शेती समस्येचे चुकीचे निदान समोर आले आहे. एकीकडे रासायनिक खते आणि कीटकनाशकांमुळे शेतकरी कर्ज बाजारी होऊन आत्महत्या करीत असल्याचे सांगत असतानाच ज्या - शेतकऱ्याच्या मुलाखती कार्यक्रमात दाखविण्यात आल्या ते स्वत:साठी सेंद्रीय धान्य पिकवितात; पण बाजारातील फायद्यासाठी रासायनिक शेती करीत असल्याचे दाखविण्यात आले आहे! यावरून आमीर खान, त्याची टीम आणि आपल्याला पाहिजे तसे आमीर खानच्या तोंडून वदवून घेणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांचा गोंधळ लक्षात येईल.

## सुखी समाजाचा प्रश्न

आज काम केले नाही तर उद्या खायचे काय असा प्रश्न पडणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्य सेंद्रीय शेतीतील आहे की रासायनिक शेतीतले हा प्रश्न कधीच पडत नाही. सुखी माणसाला पडणारा हा प्रश्नच आमीर खानला हाताळायचा होता. शेतकरी आत्महत्या हा त्याच्यासाठी तोंडी लावण्याचा विषय होता. त्याची चिंता सर्व सुखसंपन्न लोकांचे दररोज विष असलेले अन्न खाऊन त्यांना कोणत्या व्याधी होऊ नयेत हीच होती. त्याला शेतकरी आत्महत्येची चिंता असती तर त्या प्रश्नावर खोटे अश्रू ढाळणाऱ्या त्याच्या समोरील आणि दूरचित्रवाणीसमोर बसून कार्यक्रम पाहणाऱ्या प्रेक्षकांना शेतकरी आत्महत्येसाठी तेसुद्धा जबाबदार आहेत हे दाखवून देता आले असते. कांद्याच्या भावात थोडीशी वाढ झाली की, मोठा कांगावा करून, निर्यात बंद करायला लावून भाव पाडल्या जातात आणि आपले उत्पादन मातीमोल भावाने विकावे लागल्याने त्याला आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय उरत नाही हे सोपे गणित प्रेक्षकांना सांगता आले असते. सरकारची शेतीविरोधी मनमानी धोरणे आणि मध्यमवर्गीय व उच्चभ्रू समाजाची फक्त अन्नधान्याच्या बाबतीतील स्वस्ताईची हाव शेतकऱ्याला फासावर चढवीत आहे हे सत्य दडवून शेती आणि शेतकऱ्याच्या दुरावस्थेची भलतीच कारणे लोकांच्या गळी उतरविण्यात आमीर खानचा 'सत्यमेव जयते' यशस्वी झाल्याने प्रत्यक्षात असत्याचा विजय झाला आहे!

**सुधाकर जाधव**
पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८
ssudhakarjadhav@gmail.com
http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# बेकायदेशीर पुनर्वसनावर उच्च न्यायालयाची स्थगिती

## मौजे शेंद्रा, ता. जि. परभणी शेतकरी संघटनेच्या गावाचा न्यायालयीन लढा

**परभणी :** महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कायद्याच्या तरतुदीनुसार मौजे शेंद्रा, ता. जि. परभणी या गावाचे पुनर्वसन करावे म्हणून शेंद्रा गावचे दत्ता व्यंकटराव ढगे व इतर ४ रहिवाशांनी उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ४३२३/२०१२ दाखल केलेले आहे. सदर रिट पिटीशनमध्ये डॉ. प्रताप सुग्रीव काळे, उपजिल्हाधिकारी पुनर्वसन जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांनी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये मान्य केले आहे की, शेंद्रा गावाच्या पुनर्वसन करण्यासाठीचा सर्व्हे १९८० साली करण्यात आला होता व त्या सर्व्हेनुसार त्यावेळी २३४ कुटुंबांना पुनर्वसनासाठी पात्र ठरविण्यात आले होते. सदर यादीचे १९८० सालानंतर पहिल्यांदा दि. १२ सप्टेंबर २०११ रोजी चावडी वाचन करण्यात आले.

पुनर्वसन कायद्याच्या तरतुदीनुसार प्रकल्प पीडित शेतकरी असेल तर पाचपेक्षा कमी सदस्य संख्या असलेल्या एका कुटुंबाला ३७० चौरस मीटरचा प्लॉट दिला पाहिजे. सदर कुटुंबाची सदस्य संख्या ५ पेक्षा अधिक असेल तर एकूणात ७४० चौ. मीटर एवढ्या कमाल मर्यादेस आधीन राहून प्रत्येक जादा ३ व्यक्तींसाठी १८५ चौ. मी. एवढे जादा क्षेत्र उपलब्ध करून दिले पाहिजे. या शिवाय पुनर्वसन कायद्याप्रमाणे निर्धारित केलेल्या अन्य सुविधाही दिल्या गेल्या पाहिजेत यापैकी मा. उपजिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केल्यानुसार सरसगट फक्त १५० चौ. मी. चे प्लॉट उपलब्ध केले गेले आहेत आणि इतर सुविधांपैकी केवळ काहीच अंशतः उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत.

याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की, पुनर्वसन कायद्याच्या तरतुदीनुसार मौजे शेंद्रा गावचे पुनर्वसन १९८० साली व्हावयास पाहिजे होते. सरकार आता तब्बल ३२ वर्षांनी सदर गावचे पुनर्वसन १९८० साली तयार केलेल्या लाभार्थींच्या यादीनुसार करू इच्छिते ते चुकीचे व बेकायदेशीर आहे आणि प्रकल्प पिडीत व्यक्तींना झालेले प्लॉटचे वाटप मान्य नाही.

मौजे शेंद्रा, ता. जि. परभणी हे गाव शेतकरी संघटनेचे असून गेली १० वर्षे कायद्याप्रमाणे गावाचे पुनर्वसन व्हावे यासाठी शेतकरी संघटनेचे पुरुषोत्तम लाहोटी आणि ॲड. अनंतराव उमरीकर यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलने झाली. या आंदोलनात त्यांच्यावर अनेक खटले दाखल झाले असून तुरुंगवासही पत्करावा लागला आहे. न्यायासाठी रस्त्यावरचा लढा आता न्यायालयात सुरू झाला असल्याचे शेंद्रा गावातील किशोर ढगे व गणेश ढगे यांनी कळविले आहे.

## अखिल भारतीय शरद जोशी विचारमंच द्वारा खसखस लागवड परिषद

**औरंगाबाद :** शरद जोशी विचारमंचतर्फे औरंगाबाद येथे खसखस लागवड परिषदेचे आयोजन करण्याचे योजिले आहे. सदर परिषद ही सुरेगाव कापूस आंदोलन हुतात्मा दिनी १० डिसेंबर २०१२ रोजी सुरेगाव, जि. हिंगोली येथे घेण्यात येणार आहे. सुरेगाव कापूस आंदोलनात झालेल्या गोळीबारामुळे तीन शेतकरी शहीद झाले होते. या घटनेला पंचवीस वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून आयोजन करण्यात आले आहे. सदर परिषदेसाठी

*लावली खसखस काय केला गुन्हा*
*लागवड करू आम्ही पुन्हा पुन्हा*

हे घोष वाक्य आयोजक पुरुषोत्तम लाहोटी यांनी ठरविले आहे. सद्य परिस्थितीत इतर पिकांपेक्षा परवडणारे पीक असल्यामुळे शेतकऱ्यांचा ओढा या पिकाकडे आहे. खसखस पिकविण्यावर घातलेल्या बंदीचा निषेध व्यक्त करण्यासाठी, शेतकऱ्याच्या स्वातंत्र्यावर लादलेले निर्बंध झुगारून देण्यासाठी 'खसखस लागवड परिषद'चे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजक पुरुषोत्तम लाहोटी (मो. ९८६०२०३०६२), प्रदेश अध्यक्ष, शरद जोशी विचारमंच यांनी कळविले आहे. या परिषदेच्या आयोजनात ॲड. अनंत उमरीकर, ॲड. प्रकाशसिंह बी. पाटील, श्री. उत्तमराव वाबळे, श्री. कैलास तवार यांनी पुढाकार घेतला आहे.

**मिरचीचे खळे...** **पान १३ वरून पुढे**

कार्यकर्ते पोलिसांना भेटतात. मग पोलिस गुन्ह्याची नोंद करतात आणि तपास करतानांच. मानवतावादी दृष्टी ठेवून सुटकेची सोय करतात. त्याला पुढे सरकारी वकलीलंही साथ देतात आणि म्हणून हे प्रमाण केवळ ९ टक्केच उरतं. याला कारण आपल्या राज्यातील आपले कार्यकर्ते, पोलीस आणि वकील. या सर्वांचा त्यांच्या त्यांच्या परीने असलेला 'मानवतावादी दृष्टीकोन' आहे हे आपण लोकांना समजावून सांगायला पाहिजे.

कुणीही स्वभावानं गुन्हेगार नसतो. त्याला परिस्थिती तसं बनवते. हा समाजशास्त्र आणि मानसशास्त्राचा सिद्धांत आहे आणि याचे आपण फॉलोअर्स आहोत. म्हणून आपल्याकडे गुन्हेही जास्त घडतात आणि शिक्षेचे प्रमाणही नगण्यच असतं. हे लोकांच्या लक्षात आणून द्यायला पाहिजे.

आणखी एका क्षेत्रात आपण आघाडीवर आहोत. केंद्रिय मंत्रालयाच्या राष्ट्रीय गुन्हेनोंद ब्युरोनं त्यांच्या अहवालात नमूद केलंय, की २०११ या वर्षात देशभरात १४ हजार ४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि त्यातही महाराष्ट्र आघाडीवर आहे. महाराष्ट्रात सर्वाधीक म्हणजे ३३३७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्या आधीच्या वर्षी हाच आकडा ३१४१ होता. म्हणजे आपण याही वर्षी पहिला नंबर टिकवून ठेवला आहे. या श्रेयाचे मानकरी अर्थातंच आपले 'अड्याळ महर्षी' केंद्रिय मंत्र्यालाच जातं. त्यांनी आयात निर्यातीच्या बाबतीत केंद्र सरकारच्या धोरणात दखल न देण्याचं 'पुण्यकर्म' केलं. आपण लोकांना समजावून सांगायला पाहिजे, की आपण वेळोवेळी ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, विधान सभा, लोकसभा कृषिउत्पन्न बाजार समिती, साखर कारखाने आणि तत्सम निवडणूक प्रसंगी आपल्या मतदार शेतकऱ्यांना जी 'मदत' करतो त्यामुळे त्यांचे काही दिवस तरी सुखात जातात नाही तर हाच मृतांचा आकडा आणखी मोठा झाला असता. तेव्हा ही आपली जमेची बाजू लोकांना आपण समजावून दिली पाहिजे.

शेवटी एक राझची बात सांगतो. शेतकऱ्यांच्या या आत्महत्या प्रकरणाकडे आमचे श्रेष्टीही फारसं लक्ष देत नाही आणि आम्हीही. त्याचं काय आहे, की या आत्महत्या आता दैनंदिन जीवनाचा एक एवढा भाग झाल्या आहेत, की त्याकडे लोकांचं लक्षंही जात नाही. पेपर उघडला, की आपण बातम्या वाचतो त्या अपघाताच्या आणि त्यात मरण पावणाऱ्या माणसांच्या. क्षणभर हळहळतो आपण आणि सारं विसरून जातो. अपघात टाळण्यासाठी काही करावं लागतं ही अपेक्षा आता लोकंही ठेवत नाहीत आणि आपल्याला तर काही घेणं देणंच नसतं अशा घटनाशी. तसं शेतकऱ्यांच्या आत्महत्येचं झालंय. ती बातमी तर आता कुणी वाचतंही नाही. आपल्याला विचारतही नाही आणि आपण मयताच्या नातेवाईकांचा लाखभर रुपये आणि ढीगभर कोरडी सहानुभूती दाखवतो आणि 'बरीजिम्मा' होतो.

आणि यातही एक राझ की बात आहे ती अशी, की आपण कसंही वागलो, शेतकऱ्यांचे कितीही बळी जावू दिले तरी त्यांच मत हे मात्र आपल्यालाच मिळतं. मग त्याच्या आत्महत्येशी आपल्याला काय घेण देणं? त्या लाल बिल्लेवाल्यांना ओरडूद्या किती ओरडायचं ते!

■■